सुविचार

कुछ लोग इसलिए परिपक्व नहीं बन पाते क्योंकि उन्हें भय होता है कि कहीं वे वृद्ध न हो जायें और कुछ इसलिए क्योंकि वे जिम्मेदारी लेने से मना कर देते हैं ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक यशवंत
✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ बुधवार दि. १२ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

बारामतीत मोठे उद्योग आणणार विकासासाठी मोदींची मदत घ्यायला मागे-पुढे बघणार नाही

पुणे : लोकसभा निवडणुकांमध्ये एनडीए आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं असून केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात सत्ताही स्थापन करण्यात आली आहे. नरेंद्र मोदींसह एनडीएमधील ७२ खासदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामध्ये, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाने मोदींना समर्थन दिले आहे, विशेष म्हणजे अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील एकाही खासदाराला मंत्रिपद देण्यात आले नाही. तरीही, विकासाच्या मुद्द्यावरुन आपण मोदी सरकारसोबत असल्याचं अजित पवार यांनी स्पष्ट केलं. आता, शरद पवार यांनीही बारामतीच्या विकासासाठी मोदींचीही मदत घ्यायला मागे-पुढे बघणार नाही, असे विधान केले आहे. बारामती येथे शरद पवार यांच्या उपस्थितीत व्यापारी मेळावा पार पडला. यावेळी, बोलताना बारामतीच्या विकासासाठी आपण सदैव तत्पर असल्याचं पवार यांनी म्हटलं. तसेच,

आज आनंदाचा दिवस, असे म्हणत शरद पवारांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. दुष्काळी दौऱ्यासाठी मी जेव्हा निघतो तेव्हा पावसाची सुरुवात होते, असा माझा अनुभव आहे. हे पावसासाठी चांगले वर्ष आहे, त्याचे परिणाम आपल्याला बघायला मिळतील. यंदा उत्तर प्रदेश साखर उत्पादनात दोन नंबरला गेला, राज्य सरकारने शहाणपण दाखवले नाही. महाराष्ट्रात साखरेचे उत्पादन जास्त झालं, पण केंद्र सरकारने निर्बंध आणले, हे निर्बंध आणू नका, असे मी त्यांना सांगितलं होतं. मात्र, निवडणूक होईपर्यंत आम्ही तुमचे ऐकणार नाही, असे मला सांगण्यात आले. केंद्र सरकारने यंदा इथेनॉलला बंदी घातली, त्यामुळे कारखानदारीचे नुकसान झाले. अपेक्षा अशी आहे की, हे चित्र आता **(पान ६ वर)**

चंद्राबाबू नायडू बुधवारी घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ

विजयवाडा : आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांचे नवे सरकार स्थापन होणार आहे. उद्या म्हणजेच १२ जून रोजी चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. यासंदर्भात चंद्राबाबू नायडू यांनी विजयवाडा येथील ए कन्व्हेन्शन सेंटरमध्ये एनडीएच्या सर्व १६४ आमदारांसोबत बैठक घेतली. यावेळी चंद्राबाबू नायडूंच्या मंत्रिमंडळात एकूण २५ मंत्री असतील. यामध्ये टीडीपीचे १९, जनसेनेचे ४ आणि भाजपचे २ मंत्री असणार आहेत.

लोकसभा निवडणुकीसह झालेल्या १७५ विधानसभा जागांच्या आंध्र प्रदेश विधानसभेत टीडीपीसोबत असलेल्या एनडीएने एकतर्फी विजय मिळवला होता. या निवडणुकीत टीडीपीचे १३५ आमदार, अभिनेते पवन कल्याण यांच्या जनसेनेचे २१ आमदार आणि भाजपचे ११ आमदार निवडून आले आहेत. दरम्यान, बैठकीनंतर टीडीपी प्रमुख चंद्राबाबू नायडू म्हणाले भाजप, जनसेना **(पान ६ वर)**

ठाकरेंची विधान परिषदेतही पुन्हा तीच चूक काँग्रेसचे नेते प्रचंड नाराज

मुंबई : लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीने महायुतीपेक्षा जास्त जागा जिंकल्याने आता मविआ राज्यात एकनिष्ठ राहून काम करेल, असा सर्वांचा अंदाज होता. मात्र, या अंदाजाला छेद देत मविआने पुन्हा आपले रंग दाखवायला सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत मविआशी चर्चा न करता उद्धव ठाकरेंनी सांगलीतून थेट ठाकरे गटाचा उमेदवार जाहीर केला होता. यामुळे काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी बंडखोरी केली आणि अंतिमतः विशाल पाटीलच विजयी झाले. यामुळे मविआला मोठा फटका बसला. मात्र, यातून धडा न घेता ठाकरेंनी पुन्हा तशीच चूक विधानपरिषदेत केली आहे. त्यामुळे काँग्रेसचे नेते त्यांच्यावर प्रचंड नाराज झाले आहेत.

महाविकास आघाडीत आता नव्या वादाची ठिणगी पेटली आहे. विधान परिषद निवडणुकीमध्ये ठाकरे गटाने विधानपरिषदेचे परस्पर चारही जागांवर उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेस नेत्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. महाविकास आघाडी असल्याने उमेदवारांची घोषणा करण्यापूर्वी अगोदर चर्चा करायला हवी होती, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

कोकण पदवीधर आणि नाशिकच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही

उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेमुळे काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला आणि काँग्रेस नेते संतप्त झाले आहेत. विधान परिषदेच्या कोकण पदवीधर आणि नाशिकच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही आहे. मात्र, लोकसभा जागावाटपाप्रमाणे उद्धव ठाकरेंनी परस्पर उमेदवार घोषित केल्याने काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजीची लाट पसरली आहे.

कधी होणार विधानपरिषद निवडणुका?

दरम्यान, विधान परिषदेच्या चार **(पान ६ वर)**

लातूर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचितखासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी निवडून आल्यानंतर प्रथमच राज्याचे माजी मंत्री मार्गदर्शक दिलीपराव देशमुख साहेब यांची आशियाना बंगल्यावर भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले याप्रसंगी खासदार डॉक्टर काळगे यांनी यावेळी दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करून विजयाबद्दल आभार व्यक्त केले.

मणिपूरकडे लक्ष देण्याची गरज

नागपूर : प्रतिनिधी - मागील काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. दोन समुदायांतील वादामुळे तेथे कायम तणावाचे वातावरण आहे. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यूही झाला होता. तसेच अनेकदा जाळपोळीच्या घटनाही घडल्या आहेत. यात सरकारने लक्ष घातले पाहिजे असे म्हणत मणिपूरमधील या परिस्थितीबाबत सोमवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही अप्रत्यक्षपणे मोदी सराकरला लक्ष्य केले.

दरम्यान, नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर आयोजित कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोपीय सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी

'निवडणुकीत स्पर्धा करा पण मर्यादा पाळा' असे म्हणत सत्ताधा-यांचे कान टोचले आहेत. १० वर्षे शांत राहिलेले मणिपूर गेल्या वर्षापासून अशांत आहे. गेले दहा वर्षे तिथे शांतता होती. अचानक तिथे अशांतता घडली. तिथे जे काही झाले, ते घडले आहे की घडवले आहे, असा प्रश्न आहे.

देशात एनडीएचे सरकार परत आले आहे. देशात गेल्या १० वर्षांत बरेच काही चांगले झाले. आर्थिक क्षेत्रात, संरक्षण क्षेत्रात आमची प्रगती झाली. मात्र, अजूनही प्रश्न संपलेले नाहीत. **(पान ६ वर)**

बटाटा, कांदा, टोमॅटोच्या दरात ८१ टक्क्यांनी वाढ

पुणे : प्रतिनिधी - गेल्या वर्षभरात महागाई वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक वस्तूंच्या दरात वाढ झाली आहे. महागाई दर हा ५ टक्क्यांपर्यंत गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, अन्नधान्याच्या महागाईत कोणतीही घट झालेली नाही. गेल्या वर्षभरात बटाटे, कांदे आणि टोमॅटोच्या दरात ८१ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामुळे व्हेज थाळीच्या किमतीत देखील वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १५ दिवसांत कांद्याच्या घाऊक भावात ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाईटवरील आकडेवारीवर नजर टाकली तर, गेल्या वर्षभरात बटाटे, कांदा आणि **(पान ६ वर)**

घाईमध्ये निमंत्रण द्यायचे राहून गेले

मुंबई : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्यभर मनसे नेत्यांनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला. प्रत्यक्षात राज ठाकरे यांनी मैदानात उतरत महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतल्या होत्या. मात्र मनसेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण मिळाले नसल्याची खंत मनसे नेत्यांनी व्यक्त केली. मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी शपथविधीसाठी आम्हाला आमंत्रण मिळाले असते तर आनंद झाला असता असे म्हटले.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर रविवारी नरेंद्र मोदी यांनी तिस-यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला देशभरातील मान्यवरांसह परदेशातील **(पान ६ वर)**

अंतराळातील सूक्ष्म राक्षसाचे सुनीता विल्यम्स समोर आव्हान

वॉशिंग्टन : - सुनीता विलियम्स आणि त्यांचे सहकारी अंतराळवीर बच विल्मोर हे जून ६, २०२४ रोजी नवीन बोईंग स्टारलायनर अंतराळयानाद्वारे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले. ते पृथ्वीवर परत येण्यापूर्वी अंतराळ स्थानकावर एक आठवडा राहणार आहेत. मात्र आता सुनीता विल्यम्स आणि इतर आठ सदस्यांच्या टीमसमोर एक नवीन आव्हान उभे ठाकले आहे. या स्थानकावर आढळलेला 'सुपरबग' त्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो.

अंतराळ स्थानकावर नेहमी अंतराळ कचरा आणि उल्कापिंडांची धास्ती असते, पण आता या सहप्रवासातून आलेले आणि गेल्या २४ वर्षात विकसित झालेले हे जंतु आणखी मोठी चिंता बनली आहे.

नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीच्या डॉ. कस्तूरी रंगास्वामी यांनी या सुपरबगवर केलेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की, पृथ्वीवरील जंतुंपेक्षा अंतराळात आढळलेले हे जंतु वेगळे असून त्यांच्यात उत्परिवर्तन झाले आहे. ते अधिक तग धरून राहण्याची क्षमता विकसित करून घेत आहेत.

(पान ६ वर)

स्वा.रा.ती.म. विद्यापिठाच्या चांगल्या कामात प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे यांचा मोठा वाटा

लातूर / प्रतिनिधी- प्रत्येकांमध्ये काहीतरी करण्याची उर्मी असते.संधी मिळाली की त्याचे सोने करणे आवश्यक असते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उभारणीत आणि अनेक चांगल्या कार्यात प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे.जातिपातीविरहित राष्ट्रीय सेवाग्राम चलबुर्गा गावच्या उभारणीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मोटे यांचे योगदान खरोखरच मोठे आहे. प्राचार्य डॉ.मोटे यांनी प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत शिक्षण घेतले.प्राध्यापक म्हणून ही नावं कमावले.प्राचार्य ते सेवानिवृत्त झाले.त्यांचा सेवेकऱ्यांचा पिंड आहे.बांधिलकीने काम करणारा हा आदर्श माणूस आहे.अशा शब्दात माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांनी डॉ. नागनाथ मोटे यांच्या विषयी गौरवोद्गार काढले.

माजी प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे यांच्या वैवाहिक सहजीवनाचा सुवर्ण महोत्सव आणि वयाचा अमृतमहोत्सव रविवार,दि.९ जून २०२४ रोजी अनुसया मंगल कार्यालय लातूर येथे संपन्न झाला. त्यावेळी अध्यक्षपदावरुन डॉ.जनार्दन वाघमारे बोलते होते.मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून स्वागताध्यक्ष ड.अण्णाराव पाटील,कोल्हापूर विद्यापीठाचे माजी रजिस्टार डॉ.एम.बी. चव्हाण,माजी महापौर ड.दिपक सुळ, साहित्यिक डॉ.जयद्रथ जाधव, माजी आरोग्य सभापती भानुदास सोलंकर, सौ.बिटूबाई सोलंकर,माजी नगरसेविका, सौ.रागिणी यादव, श्री.संभाजी सुळ,माजी अति.जिल्हाधिकारी गो.मा.मांडुरके आणि सत्कारमूर्ती डॉ.नागनाथ मोटे व विद्यावती मोटे मंचावर उपस्थित होते.

शिक्षणामुळे स्वाभिमानी व सुखी जीवत जगता येते. त्यासाठी संघर्ष करावा लागत. शिक्षणातून माणसाने मानवी मूल्य आत्मसात करून पुढे गेले पाहिजे.डॉ.आंबेडकरांच्या संदेशामुळे निजामी राजवटीतील दलित समाज शिकला.नोकरीला लागला आणि सुखी झाला. दूरदृष्टीचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे राज्यात ईबीसी सवलत लागू झाल्यामुळे ग्रामीण भागातील हजारो ओबीसींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची दारे खुली झाली. प्रत्येकात काहीतरी करण्याची ईच्छा असते.त्यासाठी त्याला संधी हवी.डॉ.नागनाथ मोटे हे असेच एक समाजासाठी काहीतरी देणे आहे या भावनेतून निष्ठेने काम करत आले. त्यांच्या पत्नीचा त्यांच्या यशात मोठा वाटा आहे.पत्नी नसेल तर आपण उन्हातच असतो.आपल्या सुखासाठी ती जगत असते, सांगून डॉ.मोटे परिवाराने आयोजिलेल्या आदर्श सोहळ्याबद्दल डॉ.जनार्दन वाघमारे यांनी कौतुक केले.

डॉ.जयद्रथ जाधव यांनी डॉ.मोटे हे उर्जेस्व व्यक्तिमत्वाचे आहे,प्राध्यापक,प्राचार्य आणि स्वारातीम विद्यापीठात विद्यार्थी कल्याण संचालक,रासेयो समन्वयक,परीक्षा नियंत्रक या पदांवर **(पान ६ वर)**

CBSE Affiliation No. 1131357
ADMISSIONS OPEN
CBSE Class : NUR to X
FOUNDATION CLASSES FROM 6 TO 10
BUMPER DISCOUNT ON TRANSPORTATION

Distance	Regular Charges	Discount before 20 June 2024	Discount before 31 June 2024
Up to 2 Km	13,000	7,000	4,000
Above 2 Km	15,000	7,000	4,000

Computer Lab
Language Lab (Phonetics)
Science Lab
Maths Lab
Robotics Lab
Music Room
G. K. International School
Shellhal Road, Udgir
☎ 9503750007 / 9168050007

दैनिक
यशवंत
अहमदपूर/चाकूर परिसर
बुधवार दि.१२ जुन २०२४
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) अहमदपूर येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रतिवर्षा प्रमाने याही वर्षी अहमदपूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

अहमदपूर शहरातील लेक्चर कॉलणी मधील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहात सकाळी अहिल्यादेवीच्या प्रतिमेचे पुजन व ध्वजारोहण भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव,भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी,सुरेश हाके,रमेश पाटील,अशोक शेळके,चंद्रशेन पाटील,पिनू पाटील,माणीक नरवटे,हणमंत देवकते, सुर्यकांत चिगळे,गोविंद बैकरे,डॉ.खडके जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष होळकर, कुलदीप हाके,संतोष कोटलवार यांची उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त अहमदपूर शहरातील प्रमुख मार्गावरून निघालेल्या भव्य मोटार सायकल रॅलीने अहमदपूर शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

सायंकाळी अहमदपूर शहरातील मुख्य रस्त्यावरून अहिल्यादेवी होळकर यांनी प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणुक भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघाली होती. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे यानीही मिरवणूकीत सहभागी होऊन अहिल्यादेवीना अभिवादन केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी जयंती सोहळ्याचे अध्यक्ष संतोष होळकर, सरपंच लखन घोडके,संग्राम नरवटे,राजू नरवटे, नाना नरवटे, आनंद देवकते,अनिल धुळगुंडे, पंडित मरनांगे, बालाजी पारेकर,पापा देवकते,पांडुरंग लोहकरे, गंगाराम पोले,मारोती तरडे, शाम देवकते, दिनकर बडूरे, कृष्णा देवकते, सोमनाथ फुले,गणेश नरवटे, बालाजी सुरनर, बालाजी देवकते, नामदेव सुरनर, प्रदीप खोमणे, बालाजी हेमनर, तुकाराम देवकते, पांडुरंग चिलगर, परमेश्वर पोले, राम सुरनर यांच्या सह सार्वजनिक अहिल्यादेवी होळकर जयंती समिती च्या पदाधिकारी तसेच अहमदपूर शहर व तालुक्यातील समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

साने गुरुजी यांचा स्मृतिदिन उत्साहात साजरा

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) साने गुरुजी यांचा स्मृतिदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात दि.११ जून २०२४ रोजी साने गुरुजी स्मृतिदिनानिमित्त संत ज्ञानेश्वर विद्यालयात पांडुरंग सदाशिव साने यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्या लिनेस क्लबच्या अध्यक्षा सुनंदाताई कुलकर्णी यांनी प्रथमतः साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि उपस्थित विद्यार्थ्यांना साने गुरुजींच्या श्यामची आई या पुस्तकातील पत्रावळी ही संस्कार क्षम कथा मुलांच्या मनात रुजविली. पूज्य साने गुरुजी म्हणजे एक थोर मातृभक्त, विद्यार्थी प्रिय शिक्षक,निस्सीम देशभक्त, आणि उत्कृष्ट कवी ,लेखक होते त्यांची खरा तो एकची धर्म ही प्रार्थना म्हणजे जगाला दिलेले मानवतेच्या अक्षरदान आहे.तसेच त्यांची कथा मानवाला सुसंस्कार देउन मानवाच्या विकासासाठी दिलेले अमूल्य विचार आहेत असे मार्गदर्शन सुनंदाताई कुलकर्णी यांनी केले.

याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस देऊन त्यांचे कौतुक केले. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे मुख्याध्यापक तथा लिनेस मीनाक्षी तोवर ,लिनेस संगीता आबंदे,लिनेस सविता पाटील व शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

सुरनर कुटुंबांनी स्वीकारला बौद्ध धम्म

हडोळती दि.११(नागसेन गायकवाड) सुरनर कुटुंबांनी स्वीकारला बौद्ध धम्म स्वीकारला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि. ८ जुन २०२४ रोजी भारतीय बौद्ध महासभा अहमदपुरच्या वतीने आयोजित बौद्ध धम्म दिक्षा सोहळा संस्कार बुद्ध विहार, गायकवाड कॉलनी, अहमदपूर येथे संपन्न झाला. यावेळी सुनेगाव सांगवी येथील रहिवाशी असणारे सुरनर परिवाराने हिन्दू धर्माचा त्याग करुन बौद्ध धर्म स्वीकारला आहे.

रमेश किशन सुरनर , प्रदीप रमेश सुरनर, शक्तिमान रमेश सुरनर, कुलस्वामिनी गणेश सुरनर,प्रीती गणेश सुरनर, बंडू किशन सुरनर,शिरीष बंडू सुरनर,सोनल बंडू सुरनर, शिशिर बंडू सुरनर. वरील सर्व हिंदू धर्मातील कुटुंबांनी हिंदू धर्माचा त्याग केला.धर्मांतर करून पुज्य भंते धम्मबोधी (मुंबई) यांच्याकडून त्रिशरण पंचशील ग्रहण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचे पालन करण्याची शपथ घेऊन बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन धर्म परिवर्तन केले. वरील सर्व धर्मांतरित कुटुंबाचे बौद्ध धर्मामध्ये मनस्वी स्वागत व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

टी.सी. हरवली आहे

अथर्व उमाकांत कबीर नावाची **महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर** तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथील १० वी पासची टी. सी. अहमदपूर **ते शिरुर ताजबंद** प्रवासादरम्यान हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मोबाईल नंबर–९१६८९४२५३५

प्रशासन, राजकारण आणि समाजकारणाचा ज्ञाता – डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी

दि. १० जुन रोजी डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी यांच्या जन्मदिवस. त्या निमित्ताने त्यांच्या सहवासातील आलेले अनेक अनुभव. डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी हे सामान्य परिवारातुन उच्च शिक्षण घेणारं एक आगळ-वेगळं व्यक्तिमत्व. त्यांच्या सहवासातुन हे शिकावयास मिळते की जीवन जगत असताना कश्या पद्धतीने जीवन जगले पाहिजे. संत कबीर म्हणतात – ऐसी बाणी बोलिए मन का आफा खोय, औरन को शितल करे आपहु शितल होय. या दोह्याप्रमाणे डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी हे आपल्या मुखातुन समोरच्या व्यक्तीच्या मनावर, ह्दयावर प्रभाव पाडणाऱ्या बोलीचा उपयोग करतात. यामुळे ते स्वत:ही शितल म्हणजेच शांत राहतात आणि दुसऱ्यालाही कबीरांनी सांगितल्याप्रमाणे, महात्मा गौतम बुद्धांच्या शिकवणुकीप्रमाणे शांत करतात. हे त्यांच्या चारित्र्यामधील सगळ्यात चांगला गुण आहे. लहान, थोर, अबालवृद्ध कोणीही असो त्यांना प्रेमाने, आपुलकिने बोलुन त्यांची मने जिंकणारा समाजधुरंधर म्हणजे डॉ. सिद्धार्थकुमार होय.

त्यांचा माझा सहवास २००८ पासूनचा.. मात्र कौटुबिंक संबंध फार दिर्घकाळापासुनचे आहेत. त्यांचे वडील स्मृतिशेष दिगंबर सुर्यवंशी हे माझ्या वडीलांचे जवळचे. उदगीर येथे पेठवेस जवळ त्यांचे मुळ घर. लहानपनी आम्ही घरी जायचो. घरातील सर्व सदस्यांसोबत आपुलकीचे व स्नेहाचे संबंध होते. माझे वडील स्मृतिशेष गोविंद (गायकवाड) कारामुंगीकर आणि डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी यांचे वडील दिगंबर हे एकत्र मिळुन अनेक कामे केले. गरीबीची चटके सोसत परिवाराचे संगोपन चांगल्या प्रकारे केले. सुर्यवंशी सरांच्या परिवारातील मंडळी, बहिणी मला लहानपनी बाला असं संबोधयच्या. मी जेंव्हा २००८ मध्ये अहमदपूर शहरात राहवयास आलो तेंव्हा असचं मी आणि मा. विलास चापोलीकर सर डॉ. सिद्धार्थ सुर्यवंशी सरांच्या वाढदिवसानिमित्त घरी गेलो असता तेथे ताईंचे भेट झाली. मी लहान असल्यामुळे त्यांना ओळखलो नाही परंतु ताईंनी मला प्रश्न विचारला तू बाला आहेस का? मी आवाक झालो, ताईंनी मला कसं ओळखलं याचं मला आश्चर्य वाटलं. आणि मी म्हणालो हो मी बाला आहे. माझ्या मोठ्या बहिणी आणि सरांच्या बहिणी एकत्र वाढल्या. खरचं तो काळ गरीबीचा जरी असला तरी ही सर्व मंडळी मनाने अगदी श्रीमंत होती. असं आमचं नातं जेंव्हा मला समजल तेंव्हा डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी सरांच्या विषयी मनामध्ये आपुलकीची भावना जागृत झाली. सरांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर आज महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण देशामध्ये आपलं नावलौकिक कमावले आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी सर हे प्रशासनाची माहिती असणारा एक ज्ञाता अवलीया. त्यांनी आपल्या कार्याच्या आणि स्वकृर्तत्वाच्या बळावर प्रशासकीय बाबींचा बारकाईने अभ्यास करुन कसलेही अवघडातील अवघड कार्य करुन समाजाप्रती ऋण फेडण्याचे महत्वपूर्ण कार्य करत आहेत. बुद्ध नगर येथील घरकुलाचा प्रश्न असो, छत्रपती शिवराय यांचा पुतळा बसविण्याचा प्रश्न असो, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा बसविण्याचा प्रश्न असो असे कित्तेक कामे प्रशासकीय चौकटीमध्ये बसवुन उत्तम रित्या हाताळुन यश खेचुन आणले. मला असे वाटते या अहमदपूर नगरीमध्ये डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी हे वास्तव करतात हे अहमदपूरातील नागरीकांचे भाग्यच म्हणावे लागेल. नगर पालीका प्रशासन, तहसील प्रशासन, पोलिस प्रशासन, जिल्हा प्रशासन, विभागीय कार्यालय प्रशासन, विधानसभा, विधानपरिषदेतील प्रशासन असो किंवा केंद्रिय प्रशासन असो या सर्व क्षेत्राची इत्यंभुत माहिती असणारा ज्ञाता म्हणजे डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी.

राजकारण आणि डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी हे नगर परिषद, जिल्हा परिषद याही पेक्षा राज्य नव्हे तर देशाचा राजकारणात सुद्धा ते कमी पडणार नाहीत. आपल्या वाट्याला आलेले कार्य ते उत्तमरित्या हाताळुन यशस्वी करतात. देशातील मोठमोठी धुरंधर राजकारणी सुद्धा त्यांना नावानिशी ओळखतात. महाराष्ट्र तर सोडा तर ते दिल्लीच्या संसदेपर्यंत कोणतेही पद नसताना जावून मा. नितिन गडकरी साहेब, राजकारणातील उच्चपदनाधिस्त व्यक्ती यांच्यासोबत जेंव्हा त्यांची फोटो आम्ही फेसबुकवर, व्हाट्सअप वर पाहतो तेंव्हा मन भरुन येतं. खरचं अश्या माणसांना देशाचे राजकारण करण्याची संधी मिळाली पाहिजे असे मनात विचार येतात.

साहित्य संगीत कला अकादमी च्या माध्यमातून या परिसरात सामाजिक, सांस्कृतिक चळवळ उभी करण्याचे मौलिक कार्य जर कोणी केले असेत तर ते डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी यांनी केले आहे. सामाजिक क्षेत्रात काम करताना सामान्यांच्या भावनेचा विचार करुन अगदी बारीक-सारीक गोष्टी ते लक्षपूर्वक करतात.

साहित्य संगीत कला अकादमीच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक चळवळ उभी करुन परिसरातील कलाकारांना एक खुप मोठं व्यासपीठ त्यांनी उभं करुन दिलं. हे आम्हा सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

विविध सामाजिक कार्यात अकादमीने लक्षवेधी असे कार्य करुन जागितिक किर्तीचा श्रेष्ठ गायक मोहमद रफी यांना अहमदपूरच्या गल्लीत आणलं. त्यांच्या परिवाराची अहमदपूरकरवासियांना भेट करुन दिली. हे अहमदपूरकरवासीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. श्रेष्ठ गायक मोहमद रफी यांच्या नावाचा चौक उभा करुन त्यांच्याप्रती असलेले प्रेम त्यांनी व्यक्त केले. हे त्यांचे कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. जात-पात, धार्मिक भेदभाव या पलिकडे जावून माणुसकी धर्म पाळणारा या परिसरातील समाजकारण करणारा खरा, सच्चा युवानेता म्हणुन आजचा तरुण वर्ग त्यांच्याकडे आशेने पाहात आहे.

भारतरत्न, विश्वरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तत्कालीन आमदार बब्रूवानजी खंदाडे यांच्या सहकार्यातून अहमदपूरात उभारला हे आंबेडकर प्रेमी जनतेसाठी किती अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्याप्रती सांगायचे झाले म्हणजे ते युवकनेते, एक उत्तम संघटक, उत्तम राजकारणी, उत्तम समाजकारणी, कार्यकर्त्यांच्या सूख दू:खात खंबीर साथ देणारे व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी सर आहेत. त्यांचा आज दि. १० जुन रोजी वाढदिवस. वाढदिवसानिमित्त त्यांना अनंत-अनंत शुभेच्छा आपणास सुख, समृद्धी, ऐश्वर्य, भरभराटी, उत्तम आरोग्य, दिर्घ आयुष्य लाभो. आपल्यामध्ये सिंहाची निर्भिडता, चित्याची चपळता, गरुडाची दृष्टि अधिक वृंधिगत होवो. अशी तथागताचणी प्रार्थना करतो.

डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर
यशवंत ज्यु. कॉलेज, अहमदपूर
ता. अहमदपूर जि. लातूर.
मो. नं. ९८२३११२९०७

स्वच्छतेचे काम करणाऱ्या महिलांना साडी वाटप

अहमदपूर दि.११(कारामुंगीकर) सामाजिक क्षेत्रात सातत्याने अग्रणी असनारे युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शहराची स्वच्छता करणाऱ्या सर्व महिलांना तसेच विधवा महिलांना साडी चोळी वाटप करण्यात आले.

येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजीत केलेल्या अभीष्टचिंतन व साडी चोळी वाटप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार बब्रुवान खंदाडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष कल्याणकर,माजी आमदार रामभाऊ गूंडीले,बालाजी पाटील चाकूरकर, प्रा.गोविंद शेळके, आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,माजी प्राचार्य सर एस.के. खिल्लारे,प्रा.डॉ.एन.टी. कांबळे,माजी नगरसेवक शेषेराव ससाणे,गफारखान पठाण,अँड.अमितभैय्या रेड्डी, सामाजिक चळवळीतील अग्रणी नेते अण्णाराव सूर्यवंशी, दादासाहेब देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

वाढदिवसाच्या निमित्ताने कांही हटके आणी समाजहिताचे उपक्रम असावेत या हेतूने सम्राट मित्रमंडळाच्या वतीने सर्व प्रथम सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर,महात्मा बसवेश्वर महाराज,शहीद टिपू सुलतान,गोपीनाथराव मूंडे,हुतात्मा स्मारक येथे उपस्थित राहून पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर मौजे काळेगांव येथील तक्षशिला बूध्द विहार येथे बुध्द पुजापाठ घेण्यात आली.शहरातील बौध्द स्मशानभूमी येथे वृक्षारोपण करण्यात आले

पूढे ग्रामीण रूग्णालय येथे रूग्नांना फळवाटप करण्यात आले.या प्रसंगी प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाक्के पाटील,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपरावजी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.शेवटी स्वच्छता विभागात काम करणाऱ्या महिला आणी विधवा महिला यांना साडी वाटप आणी अभीष्टचिंतन सोहळा संपन्न झाला.

या वेळी उपस्थित मान्यवरांची समायोचीत भाषणे झाली.या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मारूती बुद्रुक पाटील यांनी केले तर आभार अजय भालेराव यांनी केले तर या वेळी शेख हाशमभाई,सामाजिक कार्यकर्ते दयानंद वाघमारे,रमेश कांबळे,प्रशांत जाभाडे, आकाश सांगवीकर,पत्रकार दिनकर मद्देवार,भिमराव कांबळे,त्रिशरण मोहगावकर, शिवाजी गायकवाड, डॉ. बालाजी कारामुंगीकर, विलास चापोलीकर, गणेश मदने, मासुम शेख, प्रशांत जाभाडे, शरद सोनकांबळे,शरद बनसोडे, रवि बनसोडे, बालाजी थिट्टे, संतोष गायकवाड, बालाजी मस्के, प्रदिप कांबळे,रवी गायकवाड, उत्तम लोखंडे,आकाश पवार, सचिन बानाटे,शिक्षकनेते गिरीश गोंटे,शरद सुर्यवंशी,प्रदिप कांबळे,शरद बनसोडे,इंद्रजीत गुंजरगे,महेश कदम, गणेशराव मुंढे, मुकेश मोरे,अजय वाघमारे, आनंद सोनकांबळे,सचिन बानाटे,किरण जाधव,राहुल सुर्यवंशी,लहूजी शक्तीसेनेचे तालूकाध्यक्ष मुकुंद वाघमारे आदींची उपस्थिती होती.

चंद्रशेखर पावले यांचे निधन

लातूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे निवृत्त कर्मचारी चंद्रशेखर पावले यांचे रविवारी (दि.९ जून) पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८४ वर्ष होते.उपचार सुरू असताना एका खाजगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रविवारी दुपारी सिद्धेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.पावले यांच्या पक्षात दोन मुले,एक मुलगी, सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे.वृत्तपत्र छायाचित्रकार नारायण (तम्मा) पावले यांचे ते वडील होत.

नॅचरल शुगरने ऊस बिलाचा दुसरा हप्ता १०० रुपयांप्रमाणे केला जमा

कळंब दि.११ (प्रतिनिधी) – नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि.ने मागील गाळप हंगामामध्ये ९.५० लाख मे टन विक्रमी गाळप करून साखर उत्पादन केलेले आहे. नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांनी कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी करण्यामध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा आहे अशा सर्व ऊस पूरवठादारांचे अभिनंदन करून उभ्या उसाची मशागत करण्यासाठी आणि खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना जून महिन्यामध्ये खते बी–बीयाणे खरेदीसाठी पैशांची निकड भासत असते आणि ती वेळेवर पूर्ण करण्याच्या उद्देशानेच १०० रुपयांचा ऊस बिलाचा दुसरा हप्ता ऊस पूरवठादारांच्या खात्यावर जमा करणार असल्याचे सांगितले. तसेच मागील हंगामामध्ये ज्या ज्या ऊस उत्पादकांनी नॅचरल शुगरला ऊस पूरवठा केला आहे अशा ऊस पूरवठादार शेतक–यांनी दि.१२ जूनपासून एनसाई मल्टीस्टेट व श्री साई ग्रामिण बि.शे.सह. पतसंस्थेमधून आपापल्या खात्यावर जमा झालेली बिलाची रक्कम उचलून घ्यावी, असे आवाहन ठोंबरे यांनी केले. तसेच पुढील गळीत हंगामामध्ये ऊस पिकाची योग्य त्या मेहनतीने आणि योग्य ती जोपासणी करावी. त्यामुळे आपल्या कारखान्याच्या येत्या गळीत हंगामामध्ये ठेवलेल्या उद्दीष्टाप्रमाणे आणि पूर्ण गाळप क्षमतेने आपणा सर्वांच्या सहकार्याने कारखान्याचे गाळप होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

दीड वर्षापासून थकीत असलेले ठिबक व तुषार सिंचन योजनेचे अनुदान द्यावे – आ. पाटील

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील ठिबक व तुषार सिंचन योजनेचे मागील १५ महिन्यांपासून अनुदान प्रलंबित आहे. ते अनुदान पेरणीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी कृषी आयुक्त व फलोत्पादन संचालक यांच्याकडे केली आहे.

'पर ड्रॉप, मोअर क्रॉप' अशी घोषणा देऊन सरकारने उत्पादन वाढीसाठी ठिबक व तुषार सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. अल्प, अत्यल्प व इतर शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन घेण्यासाठी अनुदानाची सोय निर्माण केली. हे अनुदान महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर लॉटरी पध्दतीने शेतकऱ्यांची निवड होते. शेतकऱ्यांना साहित्य खरेदी करण्यासाठी पुर्वसंमती दिली जाते. संबंधित कंपनीच्या डीलरकडून घेतलेल्या साहित्याचे बील अपलोड केले जाते. कृषी अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतर अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात १ ते २ महिन्यांत जमा करण्यात येते. परंतू जिल्ह्यातील ७ हजार ९६९ शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी करुन १५ महिन्यांचा कालावधी होऊन गेला तरी देखील त्यांना अपेक्षित असलेली १६ कोटी ८३ लाख रुपयांची रक्कम त्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आलेली नाही. तर अनुसुचित जातीच्या काही शेतकऱ्यांच्या खात्यावर व सर्वसाधारण गटातील काही शेतकऱ्यांच्या खात्यावर १ एप्रिल २०२३ पासून तुटपुंजी रक्कम वर्ग करण्यात आल्याचे दिसते. मागील वर्षीचा दुष्काळ त्यात आता पेरणीचे दिवस अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांना खते, बी – बियाण्यासाठी पैशाच्या आवश्यकता आहे. शासनाच्या भरवशावर पैसे गुंतवणूक करून बसलेल्या शेतकऱ्यांना आता महत्वाच्या काळात अनुदानाच्या रक्कमेची वाट पहावी लागत आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यांना सतत कृषी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे ते प्रलंबित असलेले अनुदान पेरणीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावे अशी मागणी आ पाटील यांनी केली आहे.

गतिमान नव्हे हे तर गतिमंद सरकार – आ. पाटील

वेगवान निर्णय व गतिमान सरकार म्हणून जाहिरात करणाऱ्या सरकारचा शेतकऱ्यांबाबत एवढा आकस का आहे ? आधीच दुष्काळ त्यात कर्जाने पैसे घेऊन शेती उपयोगी साधने घेणाऱ्या शेतकऱ्यांना दीड वर्ष होऊनही त्यांचे हक्काचे पैसे मिळत नाहीत हे दुर्दैवी आहे. पेरणी अगोदर ही रक्कम शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे अशी मागणी आ. पाटील यांनी केली आहे.

नीट परीक्षेच्या निकालाची सर्वोच्च न्यायालयाच्या अधिपत्याखाली चौकशी करा – डॉ. पाटील



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे दर वर्षी नीट परीक्षा घेतली जाते. या परीक्षेमध्ये यावर्षी देशभरातील ४ हजार ७५० केंद्रावर २४ लाख ६ हजार ७९ विद्यार्थ्यांपैकी २३ लाख ३१ हजार २९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये यावर्षी ७२० पैकी ७२० गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही ६७ एवढी आहे. मात्र खरा असंतोष व भीती यामध्ये आहे की एका सेंटरवर एकापाठोपाठ बसलेल्या ७ विद्यार्थ्यांना सारखेच म्हणजे ७२० पैकी ७२० गुण आहेत. त्यामुळे या परीक्षेत काही काळाबाजार झाला आहे काय ? अशी शंका सध्या पालक व विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यामुळे या गोष्टीची सखोल चौकशी सर्वोच्च न्यायालयाचा अधिपत्याखाली व्हावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी एका निवेदनाद्वारे नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, आतापर्यंत दरवर्षीही परीक्षा सुरळीतपणे सुरू आहे व त्याचे गुण देखील शंकास्पद नव्हते मात्र यावर्षी विद्यार्थ्यांना मिळालेले गुण हे पालक व विद्यार्थ्यांना शंकास्पद वाटतात त्यामुळे या गुणांची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या निगराणीखाली एक उच्चस्तरीय समिती नेमून सखोल चौकशी करावी अशी मागणी यात केली आहे. तसेच नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे विद्यार्थ्यांना विश्वासाची हमी देणे देखील आवश्यक आहे कारण आतापर्यंत जवळपास १० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी निकालानंतर आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्येची जबाबदारी नेमकी कोणाची ? असा प्रश्न देखील त्यांनी विचारला आहे.

जिल्हा परिवर्तन मॉडेल पडले पार

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात मराठवाडा जिल्हा परिवर्तन मॉडेल हा प्रकल्प राबवला जात आहे. याचाच एक भाग म्हणून दि.७ व ८ जून रोजी तुळजापूर येथील कृषी विज्ञान केंद्रात महिला शेतकऱ्यांसाठी खरीप पेरणी पूर्व प्रशिक्षण व पेरणी पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये वातावरणातील बदलासोबत शेती कशी पूरक करावी व ती करत असताना कोणत्या पद्धतीमध्ये बदल करावा ? याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास परंडा येथे पाठींबा

परंडा दि.११ (प्रतिनिधी) – मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण द्यावे या मागणीसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी दि. ८ जूनपासून आमरण उपोषणास सुरु केले असून या आंदोलनास परंडा तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने पाठिंबा दिला आहे. तसेच सरकारने २ दिवसांत दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तहसिलदारांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे जरांगे पाटील यांचे मराठा समाजास आरक्षण मिळण्यासाठी आमरण उपोषण सुरू आहे. शासनाने याची आजतागायत दखल घेतलेली नाही. उपोषण करते वेळेस जरांगे यांची तबियत ढासळत चाललेली आहे. वाशी येथे ठरल्याप्रमाणे सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यात यावी. मराठा व मराठा कुणबी हे एकच आहेत याचा अध्यादेश काढावा. हजारो मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत. हैद्राबाद गॅजेट, सातारा गॅजेट व बॉम्बे गॅजेट लागू करण्यात यावे. शिंदे समितीस मुदतवाढ देऊन समितीचे कामकाज सुरू ठेवावे. ज्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात आली आहेत, त्यांचा डेटा प्रसिद्ध करण्यात यावा. जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावरती किंवा जाहीर सभेमध्ये विधान करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. धाराशिव येथील जात पडताळणी समितीने मराठा कुणबी, कुणबी मराठा व कुणबी प्रमाणपत्राचे पडताळणी लवकरात लवकर करून देण्यात यावी. परंडा तालुक्यात कुणबी नोंदी शोधण्यासाठी समिती स्थापन करण्यात यावी व सापडलेल्या नोंदी गावपातळीवर जाहीर कराव्यात. तसेच परंडा तालुक्यातील गहाळ झालेले रेकॉर्ड तत्काळ उपलब्ध करून देण्यात यावे आदी मागण्या केल्या आहेत.

४१ शिक्षकांच्या ऑनलाईनने आंतर जिल्हा बदल्या

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – आंतर जिल्हा बदलीने ४३ शिक्षकांपैकी ४१ शिक्षकांना ऑनलाईन पद्धतीने व समुपदेशनाने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या उपस्थितीत पदस्थापना देण्यात आल्या. या पद स्थापना देताना सर्व तालुक्यांमध्ये समान पद्धतीने पदस्थापना दिल्या आहेत. सर्व तालुक्यातील रिक्त जागांचे प्रमाण समान राहील असे धोरण ठेवले आहे. तालुके व पदस्थापित झालेले शिक्षकांची संख्या पुढीलप्रमाणे – भूम– ८, लोहारा – ७, तुळजापूर– १२, वाशी – ४,परंडा –१० अशी आहे. या प्रदस्थापना ऑनलाईन व समुपदेशन पद्धतीने पदस्थापना दिली आहे. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्याम गोडभरले, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे, अधिक्षक उध्दव सांगळे, विस्तार अधिकारी शिक्षण सुरेश वाघमारे, कार्यासन प्रमुख निरंजन घुमे, वरिष्ठ सहाय्यक सहदेव हब्बु आदींसह अधिकारी व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताह साजरा

तुळजापूर दि.११ (प्रतिनिधी) – तालुक्यातील बारूळ येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा पारंपारिक पद्धतीने व काल्याच्या कीर्तनाने दि.११ जून रोजी पार पडला.

दि.४ जून रोजी जयप्रकाश लिंबाजी पाटील, ॲड.रमेश वट्टे, सुनील नवगिरे, ॲड. पांडुरंग लोमटे महाराज, अशोक वट्टे, भगवान नाझरेकर, राजकुमार वटे, ॲड. चौगुले, नबीलाल शेख, संदीप गंगणे यांच्या हस्ते ग्रंथ पुजानाने प्रारंभ झाला. यावेळी प्रतिमा, विना व ध्वज पूजन पार पडले. यावेळी ज्ञानदेव सुपणार, शिवाजीराव सुपणार, दत्ता वट्टे, बाबुराव व्होर्टे, सुधीर शेंडेकर, कमलाकर ठोंबरे, राजेश लोखंडे, बाबुराव यावलकर, प्रभाकर धनवडे, भास्कर सगट, बाबुराव टोपे, संभाजी गोरे, स्वप्नील पाटील आदी उपस्थित होते. सकाळी ८ ते १० या वेळेत दिंडी प्रदक्षिणा पार पडली. तर १० ते दुपारी १२ यावेळेत हभप गुरु आबासाहेब धोंडोपंत महाराज यांच्या हरिभजनाने व विठ्ठलाच्या कीर्तनाने काल्याचा सोहळा पार पडला. तसेच महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी टाळकरी शिवाजी अंकुश, प्रताप तुळजापुरे, शंकर पाटील, बाळू सगर, विपिन मगर, सुजित सगर ,सुमित्रा गीते, सुरेखा अंकुश आदीसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वस्तू व सेवा कर विभागाच्या पुनर्रचनेमुळे गैरसोय

धाराशिव जिल्हा पुन्हा सोलापूर विभागाशी जोडावा

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – राज्य वस्तू व सेवा कर विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण नसताना अन्यायकारक पुनर्रचना करण्याचा घाट घातला आहे. याचा जिल्ह्यातील हजारो व्यापारी व उद्योजकांना फटका बसणार असल्याने जिल्हाभर संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हा पुन्हा सोलापूर विभागीय कार्यालयाला जोडून सध्या करण्यात आलेली पुनर्रचना रद्द करावी, अशी मागणी जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, कर सल्लागार व सराफ संघटनांनी केली आहे.

धाराशिव जिल्हा हा यापूर्वी सोलापूर विभागीय कार्यालयाला जोडला गेला होता. जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक व कर सल्लागार आपल्या विविध कामांसाठी सोलापूर येथे जात होते. परंतू अचानक या सर्व विभागांची पुनर्रचना करण्यात येत आहे. आता जिल्ह्यातील व्यापारी व उद्योजकांना आपल्या विविध कामांसाठी छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर व नांदेड असा द्रविडी प्राणायाम करावा लागणार आहे. यामुळे व्यापारी व उद्योजकांचे आर्थिक नुकसान होणार आहे. ही पुनर्रचना रद्द करून पुर्ववत करण्यात यावी, अशी मागणी प्रभारी सहाय्यक राज्य कर आयुक्त नागनाथ शिंदे, राज्य कर अधिकारी दत्तात्रय निपाणीकर यांच्याकडे व्यापारी व कर सल्लागार संघटनेच्यावतीने केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. या कर सल्लागार संघटनेचे अध्यक्ष ॲड. राहुल दुरूगकर, कैट राज्य व्यापारी संघाचे राज्य उपाध्यक्ष संजय मंत्री, मशीनरी असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश काळे, सचिव शैलेश शहा, कर सल्लागार संघटनेचे सचिव तथा सीए. दीपक भातभागे, उपाध्यक्ष ॲड. रवींद्र कदम, इंद्रजित आखाडे, महेश मिणियार, सराफ सुवर्णकार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष कपील शर्मा, तालुकाध्यक्ष संताजी मुंडे, प्रकाश खंडेलवाल, व्यापारी संघाचे सदस्य प्रमोद पडवळ, अभय राजे, कुणाल मेहता, प्रशांत पाटील, चंद्रकांत इंगळे आदी उपस्थित होते.

जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी डॉ आंबेडकर यांना वाचा नक्कीच प्रेरणा मिळेल – गायकवाड

नळदुर्ग दि.११ (प्रतिनिधी) – विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षणाचे खुप महत्त्व आहे. शिक्षण हे आपल्या उज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक असून शिक्षण यंत्राचा विद्यार्थांनी पुरेपूर उपयोग करावा. शिवाय स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे खूप मोठे साधन या शिक्षणामुळे सामाजिक आणि कौटुंबिकही आदर देखील वाढतो. तसेच शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी विद्यार्थ्याने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि आपल्या जीवनात शिक्षणा विषयी प्रेरणा देणाऱ्या महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनावे. जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचा तुम्हाला नक्कीच प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन विद्रोही साहित्यिक डॉ डी टी गायकवाड यांनी केले.

नळदुर्ग येथे जनसेवा बहुउदेशिय शिक्षण संस्था नळदुर्ग संचलित पैलवान रेवाप्पा सोनकांबळे क्रिडा प्रतिष्ठान नळदुर्ग पुणे यांच्यावतीने १० व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा राज सोनकांबळे तर प्रमुख मार्गदर्शक प्रा डॉ गौतम गायकवाड, पोलीस उप निरीक्षक इश्वर नांगरे पत्रकार भैरवनाथ कानडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी वऱ्हाडे आदी उपस्थित होते. समाजातील वरिष्ठ मंडळीच्या मार्गदर्शनाने शिक्षीत बनतो शिक्षण देणारी सर्व मंडळी हे आपले शुभचितंक असतात. परंतू चांगल्या विचारांच्या पाऊल खुणा शिक्षणाच्या दिशेने घेऊन जातात. त्या पाऊल खुणा विद्यार्थाने प्रामाणिकपणे स्विकाराव्या विचाराने विचार बदलतात. बदलाने बदलाव होते आणि तो बदल आम्हाला विद्यार्थांमध्ये बघायचा आहे असे परखड मत पोलीस उप निरीक्षक ईश्वर नांगरे यांनी व्यक्त केले.

यावेळी राज्यस्तरीय उत्कष्ठ पुरस्कार प्राप्त प्रा गौतम गायकवाड यांचा संस्थेच्यावतीने पैलवान रेवाप्पा सोनकांबळे प्रतिष्ठान आयोजित समाजभूषण पुरस्कार व भारतीय संविधानाचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सन्मानपत्राचे वाचन रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले. डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश स्कूलचा १०० टक्के निकाल लागला असून संस्थेचे १९ विद्यार्थी गुणवत्ताधारक आहेत. त्याबद्दल संस्थेचे संस्थापक मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांचे व त्यांच्या विद्यार्थांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी सेवानिवृत मुख्याध्यापक कैलास गवळी, सेवानिवृत्त प्रा डॉ महादेव गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या कल्पनाताई गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर यांना नुकताच पैलवान रेवाप्पा सोनकांबळे प्रतिष्ठानच्यावतीने समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते बंडू पुदाले, आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस के गायकवाड, सा. नळदुर्ग टाईम्स नळदुर्ग लाईव्हचे मुख्य संपादक पत्रकार दादासाहेब बनसोडे आदींचा समावेश आहे. यावेळी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शालेय उपयोगी वस्तुंचे वाटप करून बौद्ध संस्कारासाठी संस्कार विधिचे पुस्तक देऊन व डॉ डी टी गायकवाड व प्रा गौतम गायकवाड लिखीत पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पंचायत समिती उमरगा येथील सांखिकी विस्तार अधिकारी राहुल सोनकांबळे, सुधाकर सोनकांबळे, धर्मा सोनकांबळे, वैशाली माने, पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर माने, बालीका सोनकांबळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.के. गायकवाड यांनी तर आभार कैलास गवळी यांनी मानले.

संपादकीय

महायुतीची पडझड

गेल्या निवडणुकीत २३ जागा जिंकत प्रथम क्रमांकावर राहिलेल्या भाजपची घसरण झाली आहे. त्या पक्षाला एक आकडी म्हणजे केवळ ९ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपला आलेल्या या अपयशाचे आता सखोल चिंतन करावे लागणार आहे. त्याबरोबर महायुतीच्या भवितव्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४५ प्लस'ची भाजपची घोषणा यावेळी फोल ठरली. चाळीस पंचेचाळीस तर राहोच त्यांच्या निम्म्याही जागा राखण्यात तीन पक्षांची महायुती अपयशी ठरली आहे. ४८ पैकी तब्बल ३१ जागा महाविकास आघाडीने जिंकत घवघवीत यश मिळवले आहे. सर्वाधिक १३ जागा जिंकत काँग्रेस पक्ष राज्यात मोठा पक्ष ठरला आहे. राज्यात यंदाची निवडणूक महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच होती. दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत उभी फूट पडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना भाजपला जाऊन मिळाली, त्यानंतर अवघ्या एक वर्षाने राष्ट्रवादीही फुटून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटही भाजपला मिळाला. या तीन पक्षांच्या महायुतीची लढत शिवसेना ठाकरे गट, शरद पवार यांचा गट आणि काँग्रेस यांनी मिळून बनलेल्या महाविकास आघाडीशी होती. महाविकास आघाडीने वाढती महागाई, बेरोजगारी, शेतीमालाला मिळणारे कमी भाव, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या प्रश्नांना महत्त्व देत केंद्रातील आणि राज्यातील भाजप प्रणित महायुतीच्या विरोधात रान उठवले. या लढाईत राज्यातील मतदारांनी महाविकास आघाडीला साथ दिली आहे. महायुतीत भाजपने २८ जागा लढवल्या; मात्र केवळ ९ जागा राखण्यात त्या पक्षाला यश मिळाले. शिवसेना(शिंदे) १५ जागांवर लढली. त्या पक्षाला ७ जागा मिळाल्या, तर राष्ट्रवादी (अजित पवार) गटाने ५ पैकी अवघी १ जागा जिंकली. मविआमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार) ने १० पैकी ८ जागा मिळवल्या. भाजपच्या मतांचा वाटा २६.१८ टक्के, काँग्रेसचा मतांचा वाटा १६.९२ टक्के, राष्ट्रवादी (अजित पवार)चा वाटा ३.६० टक्के, राष्ट्रवादी (शरद पवार)चा वाटा १०.२७ टक्के, शिवसेना(ठाकरे) १६.७२ टक्के, शिवसेना (शिंदे) १२.९५ टक्के राहिला आहे. लढवलेल्या जागा आणि मिळालेल्या जागा यांचा विचार केला तर काँग्रेसने १७ पैकी १३ जागा जिंकून प्रथम क्रमांकाच्या जागा जिंकल्या आहेत. राष्ट्रवादीने (शरद पवार) १० पैकी ८ जागा जिंकत ८० टक्के यश मिळवले आहे. या तुलनेत भाजपची मोठी पिछेहाट झाली असून, २८ पैकी केवळ ९ जागा म्हणजे ३२.१४ टक्के यश त्यांना मिळाले आहे.

भाजपचे पानिपत

चुरशीच्या लढतीमध्ये बारामतीत महायुतीच्या सुनेत्रा पवार यांना हरवून मविआच्या सुप्रिया सुळे विजयी झाल्या. बीडमध्ये पंकजा मुंडे पराभूत झाल्या. महायुतीचे दानवे, कपिल पाटील, सुजय विखे, डॉ. भारती पवार यांसारखे मातब्बर उमेदवार पराभूत झाले. गेल्या दोन निवडणुकीत प्रचंड पीछेहाट झालेल्या काँग्रेसने या निवडणुकीत उभारी घेतली आहे. देशपातळीवर ९९ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसच्या यशात महाराष्ट्रात मिळालेल्या १३ जागांचा वाटा मोठा आहे. निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे मातब्बर नेते अशोक चव्हाण भाजपमध्ये दाखल झाले. त्यामुळे राज्यात प्रभावी नेतृत्व नसूनही त्या पक्षाने मिळवलेले यश लक्षणीय आहे. गेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची ही सरस कामगिरी ठरली आहे. काँग्रेसचा विचार आणि धोरणे यांचा प्रभाव राज्यातील मतदारांवर पहिल्यापासून आहे, तो यावेळी दृग्गोचर झाला आहे. दलित आणि अल्पसंख्याकांच्या पाठिंब्यावर काँग्रेसने हे यश खेचून आणले आहे. पक्षाची मतपेढी काँग्रेसबरोबर शाबूत असल्याचा संदेश या निवडणुकीने दिला आहे. विदर्भात भाजपचा विरोधी पक्ष काँग्रेसच असल्याचे तेथील निकाल दर्शवतात. शिवाय पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबईतही काँग्रेसने विजय मिळवला आहे. मोदी पुन्हा सत्तेवर आले तर घटना बदलतील हा काँग्रेसने केलेला प्रचार प्रभावी ठरला. जागावाटपात काँग्रेसने पडती भूमिका घेतली. उद्धव ठाकरे यांनी मोदी आणि भाजप विरोधातकेलेल्या आक्रमक प्रचाराचाही महाविकास आघाडीला लाभ झाला; याउलट भाजपच्या मोदीकेंद्रित प्रचाराने भाजप आणि मित्रपक्षांचे पानिपत झाले आहे.

बंगालमध्ये परत दीदीगिरी

विकास', मोदी यांची हमी' येथून सुरू झालेला भाजपचा प्रचार ममता बॅनर्जी मुस्लिमांचा अनुनय करतात येथवर घसरला. पण, तो निरुपयोगी ठरला. या गदारोळात काँग्रेसचेही नुकसान झाले. स्वबळावर लोकसभेच्या ३७० जागा जिंकण्याचे भारतीय जनता पक्षाचे स्वप्न ज्या प्रमाणे उत्तर प्रदेशाने उधळले त्याच प्रमाणे पश्चिम बंगालनेही. या राज्यात भाजप किमान २२ ते २३ जागा जिंकेल असे मतदानोत्तर जनमत चाचण्यांचे निष्कर्ष सांगत होते; मात्र मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने ते खोटे ठरवले. गेल्या निवडणुकीत तृणमूलला २२ व भाजपला १८ जागा मिळाल्या होत्या. या वेळी तृणमूलने २९ जागा जिंकत राज्यावर आपले निर्विवाद वर्चस्व असल्याचे सिद्ध केले. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीत असूनही आपल्या राज्यात मात्र एकला चलो रे'ची भूमिका ममता दीदींनी घेतली, ती यशस्वी ठरली असे निकालांवरून स्पष्ट होते. गेल्या विधानसभा निवडणुकीप्रमाणेच या लोकसभा निवडणुकीतही भाजपने पश्चिम बंगालवर लक्ष केंद्रित केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या राज्यात सुमारे १८ मोठ्या जाहीर सभा घेतल्या. हल्ली ज्यास रोड शो' म्हटले जाते अशी मोदी यांची एक मोठी मिरवणूकही पक्षाने आयोजित केली होती. भाजपच्या अन्य नेत्यांच्याही सभा राज्यात झाल्या. त्या सर्वांना ममता दीदींनी एकहाती उत्तर दिले. त्यांनी राज्यात १०८ सभा घेतल्या आणि अनेक 'रोड शो' केले. कोलकात्यातील मिरवणुकीत त्या तब्बल १२

किलोमीटर चालल्या. त्याचे फळ त्यांना मिळाले.

समर्थक सांभाळले

लोकसभा निवडणुकीपूर्वी काही महिने 'इंडिया' आघाडी स्थापन झाली, त्याचा तृणमूल काँग्रेस प्रथमपासून भाग होता; मात्र प्रत्यक्ष जागा वाटपाच्या वेळी ममता बॅनर्जी आणि काँग्रेसचे बिनसले. काँग्रेस पाच जागांसाठी आग्रही होता, तर दोनपेक्षा जास्त जागा न देण्यावर ममता दीदी ठाम होत्या. त्यांच्याशी तडजोड न करण्याची चूक काँग्रेसला भोवली. काँग्रेसचे एक बडे नेते अधीर रंजन चौधरी यांचा माजी क्रिकेटपटू व नवखा उमेदवार युसुफ पठाण याने पराभव केला आणि काँग्रेसच्या पदरी केवळ एक जागा आली. डावे पक्ष पूर्ण साफ झाले. प्रचाराच्या प्रारंभापासून भाजपने ममता यांना टीकेचे लक्ष्य केले होते. त्यांच्या धोरणांवरील टीका दुय्यम ठरली. ममता बॅनर्जी मुस्लिमांचा अनुनय करतात हा भाजपचा मुख्य आरोप होता. त्यांचे सरकार भ्रष्टाचारी आहे, त्या बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देतात असे सांगितले गेले. संदेशखळीचे प्रकरण ऐन धामधुमीत उद्भवले. अनेक महिलांवर बलात्कार झाले, तेथील जमीन बळकावली गेली व त्यामागे तृणमूल काँग्रेसचा नेता आहे अशी चर्चा सुरु झाली. त्यावरून राज्य सरकार व ममता बॅनर्जी यांच्यावर भाजपने टीकेची झोड उठवली. खुद्द मोदी यांनी संदेशखळीतील महिलांची भेटही घेतली. हे प्रकरण भोवणार असे वाटत असतानाच ममता दीदींनीही त्या भागास भेट दिली. त्यानंतर एक ध्वनी चित्रफीत समोर आली. त्यावरून हे प्रकरण भाजपने घडवून' आणल्याचे सिद्ध करण्यात दीदी यशस्वी झाल्या आणि त्यांनी बाजू उलटवली. महिला हा ममता दीदींचा मोठा मतदार वर्ग आहे. लक्ष्मीर भांडार'सारख्या योजनेद्वारे त्यांनी या वर्गाला तृणमूलशी घट्ट बांधले आहे. या संबंधी केसरी'ने या स्तंभात विश्लेषण केले होते (ममता आणि महिला, २३ मे) विविध योजनांमुळे मुस्लिम मतदारही त्यांच्या मागे यावेळी भक्कम उभा राहिल्याचे दिसते. दुर्गा पूजा आणि स्वामी विवेकानंद यांचे संदर्भ जागवत तृणमूल हा बहुसंख्याक बंगाली हिंदूंचा पक्ष असल्याचे प्रस्थापित करण्यातही त्यांना यश मिळाले. त्यामुळे मुस्लिम मते त्यांच्याकडे कायम राहिली; पण हिंदूंची मते भाजपला मिळाली नाहीत. तृणमूलची मतांची टक्केवारी २०१९च्या ४३.७ वरून ४५.७ झाली. भाजपची टक्केवारी ४०.६ वरून ३८.७ अशी घसरली. काँग्रेस-डाव्यांच्या बाबतीत १३.२ वरून १०.३ टक्के अशी घसरण झाली. सुधारित नागरिकत्वाच्या कायद्याचा मुद्दाही भाजपच्या मदतीला आला नाही. उलट मोदी सरकार राज्यास योग्य ती आर्थिक मदत करत नाही हे जनतेवर ठसवण्यात त्या यशस्वी झाल्या. भाजपचे अनेक बडे नेते, केंद्रीय मंत्री यांना त्यांनी धूळ चारली. पश्चिम बंगालची सूत्रे आपल्या ताब्यात आहेत हे ममता दीदींनी पुन्हा सिद्ध केले.


इकडे सर्व काही ठीक आहे, तिकडे काय सुरु आहे!
इकडे भारनियम सुरु आहे

उपदेशकथा: सुख

काही प्राणीकथा आपल्याला खूप मोठा बोध करून जातात. फक्त तो समजण्याची दृष्टी हवी, नजर हवी. रावसाहेब असेच गच्चीत बसलेले असतानाची गोष्ट. त्यांच्या समोरील भिंतीवर एक मधाचे भांडे ठेवलेले होते. कुठून कोण जाणे पण त्या मधाच्या वासाने तिथे गांधीलमाशा येऊ लागल्या. भांड्याच्या काठावर बसून त्या मधाचा आस्वाद घेऊ लागल्या. रावसाहेबांनी प्रथम त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पण त्या जसजशा वाढू लागल्या तसतशी त्यांची दखल घेणे त्यांना आवश्यक वाटले म्हणून ते भांड्याजवळ गेले. त्या माशांना उडवून लावू लागले पण त्या उडेनात. त्यांनी बारकाईनं पाहिलं तेव्हा त्यांना दिसलं की, त्या माशांचे पंख मधाच्या भाड्याला चिकटून बसले आहेत. मध खाताना हा धोका माशांच्या लक्षातच आला नव्हता. मध खाण्याच्या सुखात त्या गुरफटून गेल्या होत्या आणि आपले पंख गमावून बसल्या.कथा उपदेश : भौतिक सुखात असा एकदा का माणूस गुरफटला की, त्याचेही पंख कापले जातात.

मानसिक शांतीला पारखा होतो. एका अर्थाने सुखोपभोगाने तो अपंग होतो.

सायबर फसवणुकीत भारतीयांना

हजारो कोटींचा गंडा

डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये ऑनलाइन व्यवहार वेगाने वाढत आहेत. यासोबतच भारतात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्येही झपाट्याने वाढ होत असून भारतीयांना हजारो कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये देशात सायबर फसवणुकीच्या सात लाखांहून अधिक प्रकरणांची नोंद झाली आहे. या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्येच सायबर फसवणुकीमुळे भारतीयांचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. जानेवारी ते एप्रिल २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, सायबर फसवणुकीच्या विविध प्रकरणांमुळे भारतीयांचे १,७५० कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून या कालावधीमध्ये राष्ट्रीय सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टलवर अशा ७ लाख ४० हजारांहून अधिक प्रकरणांची नोंद झाली आहे. इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर'च्या म्हणण्यानुसार मे महिन्यामध्ये सायबर गुन्ह्यांच्या सरासरी सात हजार तक्रारी दररोज प्राप्त होत आहेत. त्यापैकी ८५ टक्के तक्रारी ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या आहेत. यावरून दिसून येते की देशात घडणारे बहुतांश सायबर गुन्हे हे पैशांशी संबंधित आहेत. हे प्रमाण मागील वर्षांच्या तुलनेत खूपच जास्त आहे. परिणामी सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये दर वर्षी वाढ होत आहे.

सायबर गुन्ह्यांची वर्षभरातील आकडेवारी पाहिली तर गेल्या पाच वर्षांमध्ये अनेक पटींनी वाढ झाल्याचे स्पष्ट होते. २०१९ मध्ये सायबर गुन्ह्यांची केवळ २६ हजार ४९ प्रकरणे नोंदवली गेली. २०२० मध्ये हा आकडा वाढून दोन लाख ५७ हजार ७७७ झाला. त्यानंतर २०२१ मध्ये सायबर गुन्ह्यांची संख्या चार लाख ५२ हजार ४१४ आणि २०२२ मध्ये नऊ लाख ६६ हजार ७९० इतकी झाली. गेल्या वर्षी सायबर गुन्ह्यांची संख्या १५ लाखांवर गेली होती. एकूण आकडा १५ लाख ५६ हजार २१८ एवढा आहे. तर या वर्षी अवघ्या चार महिन्यांमध्ये सात लाख ४० हजार ९५७ प्रकरणे समोर आली आहेत. व्यापार घोटाळ्यात लोकांना सर्वाधिक १,४२० कोटी रुपयांचे नुकसान झाले. या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये ट्रेडिंग घोटाळ्याचे २०,०४३ गुन्हे दाखल झाले आहेत. या कालावधीत डिजिटल अटकेच्या ४,५९९ प्रकरणांमध्ये लोकांना १२० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. गुंतवणूक घोटाळ्यामुळे लोकांचे २२२ कोटी रुपये आणि डेटिंग ॲप्समुळे १३.२३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

शहरांचे नामांतर करून काय साधणार?



अहमदनगरचे अहिल्यानगर तर वेल्ह्याचे राजगड नामकरण करण्यात आले आहे. मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची नावेही बदलण्यात

आली आहेत, उद्धव ठाकरे सरकारने उस्मानाबाद तसेच औरंगाबादचे नामकरण अनुक्रमे धाराशिव आणि छत्रपती संभाजी नगर असे केले. शहरांच्या नामांतरामागे केवळ 'अस्मितांची प्रतीके' भक्कम करणारी राजकीय कारणे आहेत, असे वाटते; मात्र शहरांचे नामांतर करण्याचा निर्णय नागरिकांना विचारून घ्यायला हवा. परत तसे न होता शहरांची नावे बदलण्याचा निर्णय केवळ सरकारी पातळीवर होताना दिसतो. आपण निवडून दिलेले सरकार शहरांची नावे बदलण्याचा निर्णय घेत असले, तरी यातून शहरांत राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनात काय आमूलाग्र बदल होणार आहे ?

आजची शहरे जलदगतीने बकालीकरणाकडे प्रवास करत आहेत. शहरे जगण्यालायक किमानपक्षी राहाण्यालायक करावीत, अशी कोणत्याही राजकीय पक्षाची इच्छाशक्ती नाही; मात्र शहरांचे नामांतर करण्यामागे ही राजकीय इच्छाशक्ती प्रबळ ठरते. सरकारने कागदोपत्री केलेल्या या नामांतराने शहरातील रहिवाशांना फारसा फरक पडत नसला तरी या नाव बदलण्याच्या राजकीय खेळात खर्च होणारा पैसा करदात्यांच्या पैशातून होत असतो.

एखाद्या शहराचे नाव बदलण्यासाठी सरासरी ३०० कोटी रुपयांपर्यंत खर्च येतो आणि हाच खर्च महानगराबाबत १ हजार कोटींपर्यंत पोहोचू शकतो. १९५५ मध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने जारी केलेल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की, ऐतिहासिक संदर्भ असलेली नावे शक्यतो बदलू नयेत. तसेच स्थानिक नागरिकांची मते शहरांची नावे बदलताना विचारात घ्यावीत. २००५ मध्ये यात सुधारणा करून, जर राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्तीचे नाव - नावात जोडले असेल तर बदल केला जाऊ शकतो.

आता शहरांचे नामांतराचे लोण महाराष्ट्रात दाखल झालेले मागील काही काळापासून प्रत्ययास येत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, कागदोपत्री बदललेली शहरांची नावे लोकांमध्ये रूढ झाली नसल्याची अनेक उदाहरणे आहेत. जसे की, उत्तर प्रदेशातील मुघलसरायचे नामांतर पं. दीनदयाळ उपाध्याय नगर, भोपाळ बैरागढचे नामांतर मध्य प्रदेशातील संत हिरदाराम नगर केले आहे. केवळ नामांतर करण्याऐवजी शहरातील पायाभूत सुविधांचा विचार होणे आवश्यक आहे.-माझेही मत : बाळकृष्ण शिंदे, पुणे

राशी भविष्य

सामाहिक राशिभविष्य
दि. ११ जून २०२४ ते १५ जून २०२४

……………………

मेष : नोकरी-व्यवसायात घेतला गेलेला निर्णय, एखाद्या वाटसरुला किंवा अनोळखी व्यक्तीला केलेली मदत, झटपट उरकलेली कामे आणि स्वत:वर ठेवलेला संयम यातून स्वत:ला मोठे करण्याची संधी मिळेल. नवे मित्र जोडले जातील. आर्थिकदृष्ट्या मोठी उडी घेण्याच्या संधी मिळतील. सावकाराचा ससेमिरा थोडा कमी करू शकाल. सरकारी नोकरीत असणाऱ्यांनी वादाचे मुद्दे बाजूला ठेवत पुढे जाणे अपेक्षित. आरोग्याच्या बाबतीत मात्र कोणताही निर्णय विचारपूर्वकच घेतलेला बरा.

वृषभ : आपल्या अज्ञानाचा फायदा घेऊन कोणी आपल्याला फसवत तर नाही ना याची काळजी आज आपणास घ्यायची आहे. गोड बोलणाऱ्यांपासून दोन हात दूर राहा. आरोग्याच्या बाबतीत उगाच स्वत:चाच हेका चालवू नका. प्रेमी जणांनी फार टोकाचे निर्णय आज घेणे हितकारक नाही. उधारी वसुलीवर मात्र आज विशेष लक्ष देऊ शकता. एखादे केलेले सत्पात्री दान विशेष समाधान देईल.

मिथुन : जोडीदाराची मिळणारी साथ, ऐनवेळेस धाऊन येणारे सहकारी, वरिष्ठांचा मिळणारा वरदहस्त अशा काही घटनांबरोबरच गोड बोलून आपणाकडून पार्टी उकळणारेही मित्र आज भेटणार आहेत. स्वत:ला नसता मोठेपणा देऊ नका. संशोधन कार्यात स्वत:ला मग्न ठेवा. कामाचा कोणताही बाऊ करू नका. आपणास न पचणारा पदार्थ कोणाच्या आग्रहाखातर अजिबात खाऊ नका. घरगुती वादांना वेगळे वळण लाणार नाही, असे पाहा.

कर्क : आज आपल्यासाठी फार मोठे निर्णय घेण्यासारखी ास्थिती नाही. गोंधळलेल्या ास्थितीतून बाहेर येण्यासाठी थोरा-मोठ्यांचा सल्ला हाताशी ठेवा. मित्र परिवार खरेच कोणत्या अर्थाने आपल्या जवळ येतो आहे ते लक्षात घ्या. एखाद्या जुन्या ओळखीचा फायदा घेणाराही भेटू शकतो. आर्थिकदृष्ट्या आज आपण मांडत असलेले गणित बऱ्याचअंशी जमणार आहे. मुलाच्या बाबतीत मात्र काहीसे वेगळे लक्ष आज आपणास घालावे लागेल. केवळ कोणाच्या समाधानासाठी भलतेच निर्णय घेऊन अंगाशी येऊ शकते.

सिंह : आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. बरेच दिवस ठरवलेले निर्णय अमलात आणा. कामात कोणतीही चालढकल करू नका. भाग्योदयाची मिळणारी संधी डावलू नका. कितीही अवघड वाटणारे काम एखाद्या मित्राच्या मदतीने सहज बाजूला कराल. पैसा, प्रसिद्धी आणि नावलौकिक यापैकी एखाद्या महत्त्वाचा धागा हाती येणे शक्य.

कन्या : मागे ठरविलेले अनेक महत्त्वाचे निर्णय प्रत्यक्षात आणू शकाल. आपल्यावर अवलंबून असलेल्या लोकांसाठी काही वेगळे करण्याची संधी मिळेल. हस्तगत असलेली विद्या उपयोगात येईल. नोकरी-व्यवसायात कोणतेही वाद होणार नाहीत हे पाहणे आवश्यक. विशेषत: देण्या-घेण्याचे व्यवहार वादग्रस्त होऊ देऊ नका. नव्या कामात रस घ्याल, आर्थिक डोलारा सहज सांभाळता येईल. दुसऱ्या कोणाला दुषणे देऊन स्वत:चे मोठेपण सिद्ध करण्याच्या फंद्यात तेवढे पडू नका. अनावश्यक खर्च आवरा. आरोग्याच्या बाबतीत उगाच फाजील आत्मविश्वास नडणे शक्य.

तूळ : घरगुती कामांकडे आज जास्त लक्ष द्यावे लागेल. सिनेमा, नाटक अशा काही मनोरंजनाच्या साधनांनाही महत्त्व द्याल. इंजिनिअरींग क्षेत्रात असणाऱ्यांना आज एखादा अनपेक्षित शोध लागल्याचे समाधान मिळेल. आर्थिकदृष्ट्या ठरविलेली कामे मनासारखी पूर्ण करून घेता येतील. आवडीच्या लोकांबरोबर राहण्याची संधी मिळेल. कला क्षेत्रातून आनंद लुटता येईल. फिरते विक्रेते, किराणा धान्य दुकानदार आणि औषध विक्रेत्यांसाठी आजचा दिवस विशेष चांगला.

वृश्चिक : विरोधी गटातली एखादी महत्त्वाची बातमी हाती येईल. अनपेक्षित प्रवास घडेल. नको त्या लोकांशी संगत मात्र होणे शक्य. त्यातून आपले कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. एखाद्या मित्राने मदतीसाठी पुढे केलेला हात आपणास टाळता येणार नाही. वडिलांच्या किंवा भावंडांच्या संबंधात एखादे महत्त्वाचे काम हाती घ्यावे लागेल. वैवाहिक जीवनात किरकोळ कारणांनी फार मोठे प्रसंग येऊ देऊ नका. स्वत:वर संयम ठेवा.

धनू : नात्यातले लोक, मित्र यांच्यासोबत फिरणे होईल. खाण्यापिण्याचीही लयलूट कराल. नोकरी-व्यवसायात महत्त्वाच्या निर्णयामध्ये आपणास सहभागी करून घेतले जाईल. बुद्धी कौशल्यांचा चांगलाच उपयोग होईल. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना आजचा दिवस विशेष महत्त्वाचा. लेखन, प्रसिद्धी आणि प्राप्ती याबाबतीत काही चांगल्या घटना अपेक्षित.

मकर : आर्थिकदृष्ट्या कोणतेही निर्णय चुकणार नाहीत याची काळजी घ्या. नको तिथे साहस दाखवायला जाऊ नका. पोलिस किंवा सैन्यात नोकरी करणाऱ्यांनी स्वत:चा राग आवरलेला बरा. उष्णतेचा विकार असणाऱ्यांनी आज स्वत:ला सांभाळावे. आर्थिकदृष्ट्या एकादा झटपट होणारा व्यवहार बऱ्यापैकी फायद्याचा पडू शकतो.

कुंभ : कामाच्या ठिकाणी कोणताही निर्णय चुकणार नाही याची काळजी घ्या. अधिकारी पदावर असाल तर हाताखालील लोकांशी वाद मुळातूनच टाळा. भागीदारी व्यवसायात भागीदाराचे म्हणणे ऐकावे लागेल. आपले विक पॉईंट कोणाला कळणार नाही याची खबरदारी घेत आजचा दिवस पुढे न्या. नोकरदारांना एखादा जास्तीचा अधिकार हाती येईल. व्यापारी वर्गाला व्यापारासाठी जवळपासचा अनपेक्षित प्रवास करावा लागेल. घरगुती खरेदी मौल्यवान वस्तुची खरेदीही अशीच अनपेक्षित होणे शक्य. पत्रव्यवहारात कोणतीही चूक होणार नाही याची काळजी घ्या.

मीन : आपल्या मोठ्या मनाचा गैरफायदा कोण घेत नाही ना याची काळजी घेत आजच्या दिवसातली कामे आपणास उरकायची आहेत. हाती येणारा पैसा योग्य ठिकाणीच जाईल असे पाहा. देवदर्शन, एखादे धार्मिक कृत्य किंवा सत्सशील माणसांची गाठ यापैकी एखादा प्रसंग आज घडणे शक्य. त्यातून मोठे समाधान हाती येईल. गोडधोड खायला मिळेल. पत्राद्वारे एखादी चांगली बातमी कानी येईल. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस विशेष महत्त्वाचा ठरावा.

०९ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर मंगळ व बुध परस्पर विरोधी ग्रहांचा प्रभाव आहे. त्यामुळे तुम्ही कधी कधी साधकबाधक विचार करून निर्णय घेता. तर कधी भावनेच्या भरात निर्णय घेऊन मोकळे होता. आपण त्यावेळी असे का वागलो याचे स्पष्टीकरण तुम्हाला बऱ्याच वेळा देता येत नाही. तुमची बुध्दी तल्लख आहे. यंत्र तंत्र विज्ञान या विषयात ती विशेष चालते. तुमचे मनोबल प्रचंड आहे. कोणत्याही अडचणीच्या काळतही तुमचा आत्मविश्वास कायम असतो. मैदानी व मर्दानी खेळांची, ज्युडो कराटे मार्शल आर्टसची आवड असते.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

फास्टफूड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असलेल्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी पुरेसा वेळ नाही मग मग आधार घेतला जातो तो फास्टफूडचा. झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. हे पदार्थ प्रकृतीला चांगले नसतात. त्यात खुप मीठ व साखर असते; शिवाय ते खूप तळलेले सुद्धा असतात. अतिप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे सल्ला डॉक्टर देतात तरी लोक काही ऐकत नाही मागील वर्षी एका फास्टफूड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेले ६० टक्के खाद्यपदार्थ आणि पेयांमध्ये शरीराला पोषक असे काहीही नाही. या कंपनीचे नूडल्स कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. याशिवाय चॉकलेट, केचप, सूप, पास्ता, वेफर्स, कुरकरे यासारखे पदार्थ विविध पदार्थ ही कंपनी बनवते विशेष म्हणजे हे सर्व पदार्थ मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही आपल्या मुलांच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले ही मिटक्या मारत हे पदार्थ खातात. कंपनीने या पदार्थात पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफूडचा हट्ट सोडत नाही . जेंव्हा हे पदार्थ शरीरास हानिकारक असल्याचे सिद्ध झाले होते तेंव्हा याच कंपनीने आपल्या खाद्य पदार्थातून हानिकारक पदार्थ काढून टाकण्याची हमी न्यायालयात दिली होती. नंतर कंपनीने ते तयार करत असलेले खाद्यपदार्थ आणखी पौष्टिक करण्याचे आश्वासन दिले आहे. पेप्सीको आणि मॅकडोनाल्ड यासारख्या जगप्रसिद्ध कंपन्यांवर देखील असेच आरोप झाले आहेत. तरीही या कंपन्या बनवत असलेल्या फास्टफूडची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफूडमुळे मुलांना अनेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफूड खाण्यात आल्यास हृदयरोग, टाईप २ प्रकारचा मधुमेह आणि स्थौल्याचा धोका आहे त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना फास्टफूड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफूड ऐवजी दूध-पोळी, पराठे - चटणी, कडधान्यांचा उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ मुलांना खायला द्यावे. मुलांना चविष्ठ पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही

उत्तम आरोग्यासाठी योगा गरजेचा

Yoga for humanity

पूर्वीच्या काळी खेलोगे कुदोगे तो बनोगे खराब, पढोगे लिखोगे तो बनोगे नबाबफ असे म्हटले जात असायचे. खेळाला नगण्य महत्त्व देत अभ्यासाला प्राधान्य दिले जायचे. त्यामुळे आपल्या देशामध्ये अभ्यासू मंडळी ज्याच्या त्याच्या बुद्धीच्या क्षमतेनुसार शिक्षण घेत गेली. शिक्षण उदरनिर्वाहासाठी आवश्यक असल्याचे बालवयापासूनच मनावर बिंबविले जात होते. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत क्रीडा क्षेत्रामध्ये आपल्या देशाची पिछेहाट होत गेली. आशियाई तसेच राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये एक-दोन पदके मिळविण्यापुरते आपल्या देशाचे अस्तित्व दिसत असले तरी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये अलीकडच्या काळातील काही अपवाद वगळता आपल्या देशाचा खातेफलक कोराच असायचा.

आपल्या तुलनेत लोकसंख्येने व क्षेत्रफळाने कमी आकारमान असलेले देश मात्र पदकतालिकेत गर्भश्रीमंती मानाने व सन्मानाने फिरविताना दिसून यायचे; परंतु अलीकडच्या काळात क्रीडा क्षेत्रात मिळणारा पैसा पाहून पालकच आता आपल्या मुलांना क्रीडा क्षेत्राकडे वळण्याचा आग्रह धरू लागले आहेत. सुदृढ शरीरासाठी उत्तम आरोग्य आवश्यक आहे. रुषीमुनींच्या काळापासून, आश्रम शिक्षणप्रणाली असल्यापासून गुरुकुलातील विद्यार्थ्यांना योगाचे शिक्षण दिले जात असे; परंतु कालांतराने आपणास त्याचा विसर पडला. शरीर स्वास्थ्यासाठी योगा आवश्यक असतानाही भारतीयांचा योगाकडे काणाडोळा होत गेला. शरीर स्वास्थ्याचे महत्त्व आपणाला उशिराने का होईना लक्षात आल्याने आता पदकतालिकेत आपले अस्तित्व ठळकपणे पाहावयास मिळत आहे. देशाच्या राजकारणात अनेक मातब्बर राजकीय घटक दिल्लीच्या राजकारणात व त्या त्या राज्याच्या राजकारणात चमकले आहेत व चमकतही आहेत; परंतु शरीर स्वास्थ्यासाठी व आरोग्य हितासाठी योगाचे महत्त्व कोणाच्या लक्षात येऊ नये किंवा योगाचे गांभीर्य कोणाला समजू नये ही खराखरीच शोकांतिकाच आहे; परंतु २०१४ पासून देशाच्या नेतृत्वाची धुरा नरेंद्र मोदी या नेतृत्वाकडे गेल्यापासून देशामध्ये अनेक आश्वासक बदल होत आहेत.



प्रगतीचा आलेख उंचावत आहे. नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांच्या उत्तम आरोग्याकडे व सुदृढ शरीर संवर्धनाकडे प्रारंभापासून भर दिला आहे. योगाचीही उपयुक्तता नरेंद्र मोदींनी जाणली. २७ सप्टेंबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात प्रथमच योग दिन साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. मोदींच्या या प्रयत्नांनी केवळ देशातच नाही तर जागतिक पातळीवरही दखल घेतली गेली. त्यातूनच ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रातील १७७ देशांनी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यास मान्यता दिली. २१ जून २०१५ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

त्यानंतर दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जातो. हा दिवस संपूर्ण वर्षातील सर्वात मोठा दिवस मानला जातो. या दिवशी सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर सर्वात जास्त पडतो, त्यामुळे या दिवसाला वर्षातील सर्वात मोठा दिवस म्हणतात. अशा परिस्थितीत, या दिवशी योगाचा नियंत्रित अभ्यास व्यक्तीला दीर्घायुष्य प्रदान करतो. त्यामुळेच हा दिवस योग दिन म्हणून निवडण्यात आला आहे. दरवर्षी योग दिनाच्या दिवशी एक नवीन थीम ठरवली जाते. २०२१ मध्ये लश ुळींह ेसर लश रीं होशफ ही थीम होती. या वर्षी म्हणजेच २०२२ मध्ये योगाची थीम yoga for humanity' अशी ठेवण्यात आली आहे. शरीर स्वास्थ्यासाठी सुरू केलेल्या या कार्यक्रमाला आता उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केवळ शासकीय उपक्रम म्हणून नाही तर अगदी मनापासून भारतीय जागतिक योग दिनामध्ये सहभागी होऊ लागले आहेत. एकेकाळी रामदेवबाबा व त्यांच्या अनुयायांपर्यंत ओळखला जाणारा योगा आता शहरी भाग व ग्रामीण भागातही सकाळी उत्साहाने केला जात आहे.

कुटुंबामधील केवळ एक-दोन व्यक्ती नाही तर लहान लहान बालकेही आता सकाळी उठल्यावर न चुकता योगा करताना पाहावयास मिळत आहेत. यंदाही देशाच्या कानाकोपऱ्यांत योग दिनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. देशाचे केंद्रीय मंत्री देशभरातील ७५ ठिकाणी योगाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. आपले आरोग्य सुधारण्यासाठी योगासन महत्त्वाचे आहे. प्रत्येक योगासन वेगवेगळ्या पद्धतीने कार्य करते व त्याचे आपल्या शरीराला अनेक फायदे होतात. आपल्या कुटुंबापासून आपण योगाची सुरुवात केली तरच आपल्याला योगा करण्याबाबत इतरांकडे आग्रह धरता येईल. आपल्या दिवसाची सुरुवात ही आपल्या कुटुंबासोबत योगाने करा. त्यामुळे आपले त्यांच्या सोबतचे संबंध अधिक चांगले होतील. आपल्या एकमेकांच्या भावना आणि सवयी समजून घेण्यास मदत होईल. आपल्या कुटुंबात प्रत्येक वयोगटातील माणसे असतात, त्यांच्यासोबत योगा करण्यात वेळ घालवला, तर आयुष्याकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन मिळेल. कोणती योगासने करायची ते ठरवा. योगासने करताना एकमेकांचा आधार घ्या. त्यामुळे मन एकाग्र करण्याची सवय लागेल. श्वासनासंबंधीचे इतर प्रश्न देखील सुटतील. आपल्या कुटुंबाला आपल्या समस्या स्वत:हून सांगण्याचा प्रयत्न करा. त्यावर मिळणारे उत्तर शांतपणे ऐकून घ्या. आपल्या कुटुंबासोबत बसून योगासने केल्याने दिवसाची सुरुवात ही प्रसन्न होईल. आपली चिडचिड, छातीत सतत जळजळणे व सकाळी थकवा जाणवणार नाही. आपल्याला सकारात्मक ऊर्जा प्राप्त होईल. सकाळी सकाळी योगा केल्याने आपल्यासोबत मुलांनाही व्यायाम करण्याची सवय लागते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या तक्रारी दूर होतात. त्यासाठी आपण दररोज योगा करायला हवा. जागतिक योगादिनी सर्वांनी उत्साहात सहभागी व्हा. हा कार्यक्रम केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता आयुष्याचा एक भाग बनवा. निरोगी जीवनाकडे वाटचाल करा.

निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा

माझ्या आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झाडाचे आंबे आज ही आम्ही गावी गेलो की हक्काने खातो.त्यांनी ते आंब्याचे झाड मुलासारखे वाढविले.त्यावर हक्क अधिकार आज आजोबांची मुल नातु दाखवतात. पण आजोबा नंतर बापाने लावलेले एक ही झाड नाही.आम्ही गावातून घरातुन विद्यार्थी म्हणून शिक्षणासाठी बाहेर गेलो. शिक्षणपूर्ण झाल्यावर नंतर नोकरी मिळाली. त्यामुळे गाव वावर यांच्याशी जुळणार नातं कमी कमी होत गेले.पाणी वाचवा,पाणी अडवा,पाणी जिरवा ह्या म्हणी ग्रामीण भागात सार्वजनिक जागी भिंतीवर लिहलेल दिसते.गावातील लोक त्याचे पालन ही करतात. झाडे लावतात आणि त्यांची फळे ही खातात.

मुंबई सारख्या शहरात पाणी आडवा पाणी जिरवा हा प्रकार नसतो. तर योजना आडवा निधी जिरवा असा प्रकार चालतो. उन्हाळ्यात म्हणजे एप्रिल,मे मध्ये उन्हाणे माणसांना प्रचंड उकाळा उष्णता सहन होत रोड वर उभे राहण्यासाठी कुठे ही झाड नाही. उष्णता आणि पिण्याचे पाणी कपात ही शहरतील लोकांची दरवर्षी मोठी समस्या असते.घरात कार्यालयात आणि गाडीत सुद्धा एसी असल्या शिवाय मानस जगू शकत नाही.त्यांना ऑक्सीजण मोफत मिळत नाही. तेव्हा त्यांना झाडाचे महत्व आठवते. शाळा,कॉलेज मध्ये शिकवलेले झाडाचे महत्व आता कुठे कळते. पण वळत नाही.

मुंबईतील निसर्ग निर्मित डोंगर व डोंगरातील झाडे बिल्डरनी नष्ट केले.त्यामुळे सर्वच ठिकाणी सिमेंट कॉनकरेटचे जंगल निर्माण झाले आहे.

निसर्ग सांगतो डोंगर आणि झाडाशिवाय जमीनीत पुरेसे पाणी साठवणे अशक्य आहे.

डोंगर हे जमिनीतील पाणीसाठ्याचे बाह्य कवच असते. उन्हाळ्यात डोंगराचे बाह्य आवरण तापते.मात्र भूपृष्ठापर्यंत उष्णता पोहचू न शकल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत नाही.या उलट डोंगर फोडला तर उष्णता थेट पोहचते व डोंगराच्या पोटातील ओलावा संपुष्टात येतो. पाणी जमिनीत दोन प्रकारे साठले जाते. एक मृत साठ्याचे पाणी. दुसरे जिवंत साठ्याचे पाणी.मृत साठ्याचे पाणी हे दहा फुटावर पाझरते तर जिवंत साठ्याचे पाणी दहा ते १०० व त्यापेक्षा अधिक पाळीवर आढळते. जेंव्हा पाऊस पडतो तेंव्हा नदी नाल्याचे पाणी मृत साठ्याच्या स्वरूपात जमिनीत साठले जाते.जे कि एकदा उपसले कि संपून जाते. आणि जोपर्यंत ओढे,ओघळ वहात असतात तोपर्यंतच विहीर व बोअरला पाणी असते.तर जिवंत साठ्याचे पाणी आज तरी भूगर्भातून संपलेले आहे. कारण जिवंत पाणी खोलवर जाण्यासाठी नैसर्गिक यंत्रणा हवी असते.एक पाण्याचा थेंब खडकातून पाझरून भूगर्भात जाण्याठी एक वर्षाचा कालावधी लागतो.म्हणजेच दहा फुटावर जाण्याठी दहा वर्ष लागतात.

एक झाड एका दिवसाला ५० फुटावर दहा लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते. कारण झाडं हे जमिनीच्या वर जेवढ्या उंचीपर्यंत असेल तेवढीच खोलवर त्याची मुळे असतात.म्हणून झाडं हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहे,

एक कडूनिंबाचे झाडं दहा हजार लिटर पाणी एकुण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते.याचा अर्थ आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब,चिंच,जांबळ,अंबा, मोह,अर्जुन या वर्गातील नक्कीच असतील. म्हणून मृत साठ्याचे पाणी पाझरत रहात असावे.एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाडं एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते.आणि ते ही पन्नास फुटाच्या ही खाली. वडाची व पिंपळाचे मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात.एक कोटी लिटर म्हणजे एका विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.म्हणून आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा महावृक्ष लावा.आपण एक बोअरवेलसाठी एक लाख खर्च करतो. एका विहीरीसाठी पाच लाख खर्च करतो.पण पाण्याचा कुठलीच शाश्र्वती नाही'. कारण आपली नियत ही धुर्त असते, डोंगर संपुष्टात आणण्याची,डोंगारावरील झाडं तोडण्याची व वणव्यात जाळून संपवून बोडके करायची म्हणून पाणी तरी कुठून येणार? पाण्याचे दुर्भिक्ष हे मानव निर्मित आहे.

देवाला किंवा निसर्गाला दोष देण्यात अर्थ नाही.खरे दोषी आपण मानव व आपला स्वार्थ आहे.

हवा ही ऊर्जा आहे.
पाणी हे अमृत आहे
तर माती ही जननी आहे.
तर झाडं हे जीवनदायी आहेत.

झाड नसेल तर हवा रोगट होते. पाणी विषासमान होते आणि माती वांझ होवून शापीत होते. म्हणूनच झाडांचं मूल्य समजून घ्या. आणि दहा रूपयाचं फक्त एक झाड शेत असेल तर शेतात नाहीत तर माळरानावर, डोंगरावर कुठे ही जगविण्याची जबाबदारी म्हणून झाड लावा.या शिवाय दुसरा कुठलाच पर्याय शिल्लक नाही.तुम्ही गावाचे, शहराचे,देशाचे,समाजाचे आणि स्वहिताचे जर काही देणं लागत असाल तर एवढचं साध काम करा.

झाडं मानसाचं मन,मस्तिष्क व जीवन हिरवंगार करत असतात.हे एक सदैव लक्षात असु द्या.झाडांची पाणी पाठवण्याची व वाहण्याची क्षमता त्यांच्या वयावर व प्रकारावर अवलंबून असते. झाडाचे महत्व जाणाल तर तुमचं आस्तित्व वाढेल.मी गाव सोडून मुंबई शहरात आलो तरी गावाकडील वेगवेगळ्या ऋतुत हंगामात गावी जाऊन त्याचा उपभोग घेत असतो. म्हणजे मुंगाच्या चवलीच्या शेंगा खाण्यासाठी,किंवा हुरडा खाण्यासाठी,बोर खाण्यासाठी,आंबे,चिंचा खाण्यासाठी त्या त्यावेळी गावी गेलेच पाहिजे.मुंगफळीच्या शेंगा,तुरीच्या शेंगा खाण्यासाठी त्या त्या ऋतूमध्ये गेलेच पाहिजे आणि मुलांना सुद्धा गावाकडे नेले पाहिजे.अनेक मुलांना मुंगफळीच्या शेंगा कुठे येतात.तसेच तुरीच्या शेंगा कुठे लागतात हे शहरातील मुलांना माहिती नसते.म्हणूनच प्रत्येक ऋतुत मुलांना दोन दिवसासाठी गावी नेलेच पाहिजे. आपण स्वता निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नये,मुलांना त्यात भर घालण्यासाठी तयार केले पाहिजे.

मी सेवा निवृत होण्या अगोदर माले मुळशी तालुक्यात सहली साठी गेलो होता. अनेक इंजिनियर अधिकारी सोबत होते. त्यांना घेऊन शेतावर गेलो. तिथे बटाटा पेरल होता ते हिरवागार शेत दाखवून सर्वांना विचारले हे कोणते पीक आहे. मुंबई शहरात राहणाऱ्या कोणालाच सांगता आले नाही. मग मी त्यांना सांगितले की हे बटाटे आहेत. मग स्थानिक ८४ वर्षाच्या शेतकऱ्यांची छोटीशी मुलाखत घेतली.त्याची छायाचित्र सोबत देत आहे.उन्हाळ्यात स्वतचे रक्षण करायचे असेल तर प्रत्येकानी झाडे लावली पाहिजे.आता पाऊसाळा सुरू होत आहे. म्हणूनच निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा.

-सागर रामभाऊ तायडे
मो. ९९२०४०३८५९, भांडुप,मुंबई.

मनोरंजक महाशब्दकोडे



आडवे शब्द
३. छान
५. शपथ
७. हनुमान
१०. स्वकीयांमधील धुमश्चक्री
१२. धोकादायक
१५. साद
१७. मातीचा फ्रीज
१८. कुरकुरीत गुजराती खाद्यप्रकार
१९. निष्णात
२१. सवंगडी
२२. तोंडात रामनाम असताना बगलेत ठेवायचे शस्त्र?
२३. निबर
२५. लहान मुलीचे कर्णभूषण
२६. शासन
२८. वेगळे होणे, ताटातूट
३०. सरोवर
३१. देवळात मूर्तीची जागा
३४. अभद्र
३५. दाक्षिणात्य जेवणातील आंबट क्षुधावर्धक पेय
३७. हिंदू व बौद्ध धर्मातील एक समान प्रतीक
३८. दबाव
३९. बांधलेला
४२. माजलेला
४३. याम, तीन तासांचा काळ
४४. जबरदस्ती
४५. वरच्या पदावर नेमणूक
४७. पाण्याचा कलकलाट?
५०. विलंबाने
५२. गोंगाट
५५. स्वार्थी
५८. पिच्छा, नेट, लकडा
६०. बाजार
६१. गुंड
६२. मभागाबाईफ्ला नाचवणारा, दरवेशी
६४. मित्र
६५. आजार
६६. मत्स्य
६७. भीमाने मारलेला राक्षस
६९. घर
७०. कंड
७२. धनुष्य
७४. प्रभाव, छाप
७५. रस्ता
७६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
७७. रेडा
७९. कापसाची बी
८०. आईची वहिनी
८१. वडिलांची बहीण
८२. लहान

उभे शब्द
१. पृथ्वी
२. नामस्मरणाचे साधन
३. रूपे, रजत
४. साहित्यिक
५. ओझे
६. कापडी तंबू
८. गलबत
९. प्रामाणिक
११. वाळलेले आले
१३. वजन मोजण्याचे साधन
१४. शेळीचे पिलू
१६. लग्नप्रसंगीचा गोड पदार्थ
१८. पंचखाद्यातील अरबी फळ
२०. अनियंत्रित
२१. भीक
२२. मनोरंजक, रसाळ
२४. आदराने मस्तक झुकवलेला
२६. रव्याचा गोड पदार्थ
२७. निश्चेष्ट, शुद्ध हरपलेला
२९. होडी
३२. कपाळ
३३. दक्षता
३४. एक आश्चर्याचा उद्गार
३६. सारखा
३७. वय झाकणारा रंग
३८. लाहीलाही
४०. भावनाप्रधान
४१. बहाणा
४३. चिन्ह
४४. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ
४६. मित्र
४७. वाराणशी
४८. काका
४९. वेगळे
५०. हॉटेल
५१. ढिला, मोकळा
५३. सतत, ऊठसूठ
५४. सजावट
५६. पूर्वसूचना न देता
५७. लाल रंगाचा कंद
५९. प्रशंसा
६२. मनातले ओळखणारा
६३. उद्घाटनाची फित
६८. पृथ्वी
७१. घायाळ
७३ महिना
७५. पावसाची झड
७७. खून, वध
७८. विष्णू

आडवे उत्तर

३.चांगले ५.भाक ७.अंजनेय १०.सुंदोपसुंदी १२.खतरनाक १५.हाक १७.माठ १८.खाकरा १९.तरबेज २१.भिडू २२.सुरी २३.जून २५.डूल २६.शिक्षा २८.फारकत ३०.तळे ३१.गाभारा ३४.अशुभ ३५.रसम ३७.कमळ ३८.दाब ३९.बद्ध ४२.मस्तवाल ४३.प्रहर ४४.बळजबरी ४५.पदोन्नती ४७.कालवा ५०.उशीरा ५२.कलकलाट ५५.मतलबी ५८.पाठपुरावा ६०.हाट ६१.टग्या ६२.मदारी ६४.सखा ६५.विकार ६६.मीन ६७.बकासुर ६९.गृह ७०.खाज ७२.कमान ७४.ठसा ७५.सडक ७६.खरवस ७७.हल्या ७९.सरकी ८०.मामी ८१.आत्या ८२.बारीक

उभे उत्तर

१.वसुंधरा २.जपमाळ ३.चांदी ४.लेखक ५.भार ६.कनात ८.जहाज ९.नेक ११.सुंठ १३.तराजू १४.करडू १६.लाडू १८.खारीक २०.बेलगाम २१.भिक्षा २२.सुरस २४.नतमस्तक २६.शिरा २७.बेशुद्ध २९.तर ३२.भाळ ३३.खबरदारी ३४.अबब ३६.सम ३७.कलप ३८.दाह ४०.हळवा ४१.सबब ४३.प्रतीक ४४.बलराम ४६.दोस्त ४७.काशी ४८.चुलता ४९.अलहिदा ५०.उपहारगृह ५१.सैल ५३.उठल्यासुठल्या ५४.आरास ५६.तडकाफडकी ५७.बीट ५९.वाखाणणी ६२.मनकवडा ६३.रिबन ६८.रसा ७१.जखमी ७३.मास ७५.सर ७७.हत्या ७८.हरी

पान १ वरून

बारामतीत....

बदलेल, असे म्हणत शरद पवार यांनी महाराष्ट्रातील साखर कारखानदारीवर भाष्य केले.

भाजपच्या ६० जागा कमी झाल्या

लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर महाराष्ट्रामधील लोकांचे आभार मानले पाहिजे, गेली १० वर्षे मोदी शाह यांची सत्ता होती. पण यंदा निकाल वेगळा दिसला, या देशात स्थिरता येईल अशी अपेक्षा आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत आणि स्थीर कशी राहिल याचा विचार केला पाहिजे, आज सत्तेत आले आहेत त्यांना ३०० पेक्षा जास्त जागा निवडून दिल्या होत्या. पण, आता त्या २४० झाल्या आहेत. म्हणजेच त्यांच्या ६० जागा कमी झाल्या.

अयोध्येत भाजपचा पराभव

राम मंदिर हा प्रचाराचा मुद्दा असेल मला वाटायचं, राम मंदिराचा मुद्दे घेत सत्ताधारी पक्षाला मतदान जाईल असे वाटत. मंदिराची भीती आम्हाला वाटत होती. पण, जिथं मंदिर बांधले तिथेच भाजपचा पराभव झाला. जमिनीवर पाय ठेवून काम केले पाहिजे, असे जनतेने मतदानातून दाखवून दिलं. त्यामुळे, मोदींना सरकार बनवताना बाकीच्यांची मदत घ्यावी लागली. जेव्हा दुसऱ्याची मदत घ्यावी लागते तेव्हा सरकार स्थीर असावे अशी अपेक्षा आहे. इथे मागच्या वेळी काय झालं त्याचा खुलासा केला त्याची गरज नाही, असेही पवार यांनी म्हटले.

बारामतीची चर्चा न्यूयॉर्कमध्ये

निवडणुकीमध्ये अनेक गोष्टी कानावर येत होत्या, पण मी शांत होतो. मला मला माहिती होतं की बारामतीकर सुज्ञ आहेत, त्याचा अनुभव मला आला. मतदारांनी शहापणा दाखवला हे मी फक्त आज बघतो अस नाही, हा १९६७ पासून बघतो आहे. पण, यंदा बारामतीची चर्चा न्यूयॉर्कमध्ये झाली. तुम्ही काय साधी लोकं आहात, कुठपर्यंत जाऊन पोहोचलात, असे म्हणत बारामतीकरांचं कौतुकही केलं.

मोदींची सुद्धा मदत घ्यायला मागे-पुढे बघणार नाही

आता महाराष्ट्रामध्ये सुरुवात करायची आहे, ४८ पैकी आमच्या ३० जागा निवडून आल्या असून विधान सभा निवडणुकांवर लक्ष ठेवले पाहिजे. आम्ही सत्तेत असताना काही धोरणे आखली त्याचा फायदा आता दिसतो आहे. आता पुढील काळात बारामतीत आणखी मोठे उद्योग आणणार, यासाठी तुमचे सहकार्य पाहिजे, त्यासाठी हा कार्यक्रम आहे, असे म्हणत बारामतीमधील व्यापाऱ्यांना शरद पवारांनी आश्र्वासन दिले. इथे राजकारण आणायचे नाही राज्य आणि केंद्र सरकारशी बोलून मी प्लॅन करत आहे. आम्ही निवडणूक मध्ये टीका टिप्पणी केली. मोदींनी माझ्यावर वैयक्तिक टीका केली. पण, मी त्यावर काही बोलणार नाही. विकासासाठी मोदींचीसुद्धा आगामी काळात मदत घ्यायला मी मागेपुढे बघणार नाही, असे म्हणत बारामतीच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे पवार यांनी आपल्या भाषणातून सूचवले. तसेच, तुम्ही प्रचंड बहुमत दिल्याचे सांगत बारामतीकरांना धन्यवादही दिले.

चंद्राबाबू...

आणि टीडीपीच्या सर्व आमदारांनी एनडीए सरकारमध्ये आंध्र प्रदेशचा पुढील मुख्यमंत्री होण्यासाठी मला संमती दिली आहे. दरम्यान, टीडीपीचे अध्यक्ष अच्चन नायडू, भाजपचे पुरंदेश्र्वरी आणि जनसेनेचे पवन कल्याण हे राज्यपालांची भेट घेणार आहेत.

एनडीए विधीमंडळचा नेता निवड करण्यात आल्याचा प्रस्ताव राज्यपालांना दिला जाणार आहे. यानंतर चंद्राबाबू नायडू राज्यपालांना भेटून सरकार स्थापनेचा दावा करणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्राबाबू नायडू बुधवारी सकाळी ११.२७ वाजता विजयवाडा विमानतळाजवळ मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. या शपथविधी कार्यक्रमात पंतप्रधान मोदीही सहभागी होणार आहेत.

याआधी पवन कल्याण उपमुख्यमंत्री होणार असल्याची माहिती समोर येत होती. मात्र, पवन कल्याण हे अभिनेते असल्यामुळे त्यांनी अनेक चित्रपट साइन केले आहेत. अशा परिस्थितीत ते सध्या चंद्राबाबू नायडू यांच्या मंत्रिमंडळात सहभागी होणार नसल्याचे समजते. यावेळी चंद्राबाबू नायडू यांचे पुत्र नारा लोकेश हे सुद्धा मंत्री होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आजच्या बैठकीनंतर चंद्राबाबू नायडू यांच्या घरी आणखी एक बैठक होणार आहे, ज्यामध्ये नायडू मंत्रिमंडळाचा भाग असणा-या आमदारांनाच बोलावले जाईल, असे म्हटले जात आहे.

ठाकरेंची....

जागांसाठी गेल्या महिन्यात कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यानुसार २६ जूनला मतदान होईल. मतमोजणी १ जुलैला करण्यात येणार आहे. तर ७ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे.

मणिपूरकडे...

निवडणुकीत जो काही अतिरेक झाला, त्याच्या पुढे जाऊन आता आम्हाला विचार करायचा आहे, असेही भागवत यांनी सांगितले.

भागवत पुढे म्हणाले, प्रचारात ज्या पद्धतीने चुकीचे वक्तव्य करण्यात आले, अशा वक्तव्यांमुळे समाजात तेढ निर्माण होईल, याचा देखील विचार करण्यात आला नाही. यामध्ये आम्हाला नाहक ओढण्यात आले.

मणिपूर भारताचा महत्त्वाचा भाग : सुप्रिया सुळे

गेल्या वर्षभरात मणिपूरच्या प्रश्र्नावर अनेकदा चर्चा झाली आहे. मणिपूर हा आपल्या देशाचा महत्त्वाचा भाग आहे. तिथल्या महिला, मुले, पुरुष हे सगळे भारतीय आहेत. कालपरवाच मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावरही हल्ला झाला आहे. याचा अर्थ काही तरी चुकत आहे. मणिपूरच्या प्रश्र्नावर संसदेत चर्चा व्हावी, अशी मागणी आम्ही अनेकदा केली आहे. मात्र, केंद्र सरकारने यावर चर्चा केली नाही. हे सरकार मणिपूरचा म देखील बोलायला तयार नाही. मणिपूर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, मग तिथल्या लोकांना अशी वागणूक का दिली जात आहे'', असा प्रश्र्न करत सुप्रिया सुळे यांनी सरकारची कानउघाडणी केली आहे.

बटाटा, कांदा....

टोमॅटोच्या किमतीत ८१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. देशभरात या तिन्ही भाज्यांच्या सरासरी दरात कमालीची वाढ झाली आहे.

ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाईटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी बटाट्याची सरासरी किंमत १८.८८ रुपये प्रति किलो होती. जी १० जून २०२४ पर्यंत ३०.५७ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. म्हणजेच बटाट्याच्या दरात किलोमागे ११.६९ रुपयांची वाढ झाली आहे. याचाच अर्थ गेल्या वर्षभरात बटाट्याचे भाव ६२ टक्क्यांनी वाढले आहेत.

गेल्या वर्षभरात कांद्याच्या भावात १३.५० रुपयांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षभरापासून कांद्याच्या दराने सर्वसामान्यांना रडवले आहे. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात २० ते २१ रुपये किलो मिळणारा कांदा आज रोजी ३३.९८ रुपये झाला आहे. याचाच अर्थ गेल्या एका वर्षात कांद्याच्या भावात ६६ टक्के वाढ झाली आहे.

वर्षभरात टोमॅटोच्या किमतीत मोठी वाढ

गेल्या वर्षभरात टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाली आहे. किमतीत वर्षभरात ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. बटाटे आणि कांद्याच्या तुलनेत टोमॅटोच्या दरात सर्वाधिक वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाईटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी टोमॅटोची किरकोळ किंमत २०.५५ रुपये प्रति किलो होती. आज रोजी या टोमॅटोची किंमत ३७.११ रुपयांपर्यंत गेली आहे. याचा अर्थ टोमॅटोच्या किमतीत गेल्या वर्षभरात ८१ टक्के म्हणजेच १६.५६ रुपये प्रतिकिलो वाढ झाली आहे.

ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर किमतीत मोठी वाढ

दरम्यान, ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर तर या पिकांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. ३० रुपये किलोने विकला जाणारा बटाटा ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ४१ रुपये किलो दराने विकला जातोय. कांदा ४३ ते ४७ रुपयांनी विकला जातोय. दरम्यान, या वस्तूंच्या महागाईमुळे व्हेज थाळी देखील महाग झाली आहे.

घाईमध्ये...

प्रमुख पाहुणे देखील उपस्थित होते. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांसह विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. मात्र महाराष्ट्रात महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणा-या मनसेला या सोहळ्यासाठी निमंत्रित न केल्याने मनसे नेत्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

या सगळ्या प्रकरणावर आता भाजप नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाष्य केले आहे. ही गोष्ट मी वरिष्ठांच्या कानावर टाकणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. कधी कधी घाईमध्ये निमंत्रण देताना जी यादी करतात तिथे कधी कधी आपले मित्र आहेत त्यांना निमंत्रण द्यायचे राहून जाते. केंद्रीय पक्षाने याची नोंद घ्यायला हवी. आपल्याला जेव्हा एखादा मित्र मैत्रीचा हात पुढे करतो तेव्हा असे होऊ नये याची काळजी घ्यायला हवी, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

अंतराळातील...

या संशोधनात सहभागी असलेल्या भारतीय तंत्रज्ञान संस्थान मद्रासचे प्राध्यापक कार्तिक रामा म्हणाले, अतिशय कठीण परिस्थितींमध्येही वाढणारे जंतु आपल्यासमोर कोडे उभे करत आहेत.

जागतिक शास्त्रीय नियतकालिक 'मायक्रोबायोम'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनानुसार अंतराळवीरांच्या आरोग्यावर होणारा या सूक्ष्मजीवांचा प्रभाव तपासण्यासाठी अंतराळ स्थानकावरील सुक्ष्मजीवीय वातावरणाचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे.

स्वा.रा.ती.म...

यशस्वी काम करुन स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. रासेयोच्या कामातून विद्यार्थ्यांना संस्कार आणि श्रममूल्यांची जाणीव करुन दिली. आरोग्य शिबिरे, राष्ट्रीय सेवाग्राम मधून रासेयो विभागाला नवी दृष्टी देवून कुलगुरु डॉ.जनार्दन वाघमारे सरांच्या विश्वासाला ते सार्थ ठरले. डॉ.मोटे सर मृदूभाषी असून लोकोपयोगी कार्याला वाहून घेतले आहे. या अमृत महोत्सवानिमित्त त्यांच्या कार्याचा डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते होत असलेला सन्मान आहे फार महत्त्वाचा आहे, असे मनोगत व्यक्त त्यांनी व्यक्त केले.

